# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| कार्यकारी संपादक | : | श्री. मोहन पाठक |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००३ |
| वर्ष | : | तिसरे |
| अंक | : | ५ |
| पृष्ठे | : | ३८ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ६८**

MAHMAR 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ

व्ही. पी. एम्.
# दिशा

वर्ष तिसरे / अंक ५ / एप्रिल २००३

## संपादकीय

### मार्च महिन्याचे दिवस

बदल ही नियती आहे. ज्या गौतम बुध्दांनी अहिंसेच्या विचारांचे अर्थपूर्ण तत्वज्ञान जगाला दिले त्याच जगातल्या माणसांनी या तत्वज्ञानातील मूलभूत विचारांना हरताळ फासला आणि जीवनाचे संदर्भच बदलून टाकले. वाजत गाजत आलेल्या एकविसाव्या शतकातील या तीन सव्वातीन वर्षांकडे नजर टाकली तर बदलांमधील सातत्य अवाक करते. रोज सकाळी उठल्यावर आठवून पहायचे, '' आपण आहोत का, अगदी आजही आहोत.... कालच्या संदर्भांसह जागे झालोत...?'' आणि मग सृष्टी कर्त्याचे आभार मानायचे. '' तुझ्या कृपेने आजचा दिवसही उगवला तर .... ! '' म्हणत दिवस मावळण्या पूर्वी आपले अस्तित्व मावळून टाकू नको अशी प्रार्थना करायची.

मानवी मूल्ये बदलली, त्या मूल्यविषयक जाणीवा बदलल्या जीवन शैली बदलल्या, तत्वे बदलली.... तरीही काही गोष्टी मात्र बदलल्या नाहीत. परमेश्वर असेलच त्याचे आभार मानावेत. अशा या काही गोष्टी आहेत. १३ मार्चच्या मुलुंडच्या बॉम्बस्फोटानंतर याच न बदलेल्या, सर्व धर्मांतील असणाऱ्या मानवी धर्मांचं दर्शन घडले आणि बदल हा निसर्गाचा नियम आहे, या नियमाच्या अपवादांचे भान आले तथाकथित पक्षांना मिळणाऱ्या सत्तेसाठी आणि धनासाठी आपल्या निष्ठा विकून कंगाल ठरलेल्या राज्य कर्त्यांच्या डोळ्यात धूळ फेकून हे असं काही घडतं तेव्हा नेतृत्वाच्या रूढ संकेतांना छेद देत माणसं माणसांसाठी जे करतात ते पाहून रक्ताचा रंग एकच लाल, हे पटतं. आयत्या वेळी सर्वस्वानिशी धावून येणाऱ्या निरपेक्ष माणसांकडे पाहिलं की वाटतं, सर्व बदलतं हे खरं, पण या माणसांच्या मनातला माणूस कुठे बदलला? अर्थात ही माणसं नियमांना अपवाद असतीलही ! पण हे अपवादच नियम सिद्ध करतात.

अशा प्रकरणांच पुढे काही होत नाही. ह्या प्रकरणांची सामूहिक स्मरण शक्ति अतिशय तोकडी असते हे माहीत असल्याने दाबूनच टाकली जातात. या आधीचे किती बॉम्बस्फोट, तोफांचे स्फोट, हवेत विरून गेले. रात गयी बात गयी हे जाणणारे सत्तेतील राजे ही प्रकरणं जनतेने विसरावीत म्हणून नवनवीन विषय जनतेत पेरत रहातात. हे नित्याचं झालं आहे. त्यांच्या लेखी चौकटीत कोणाची नांव आहेत याला काही किंमत नसते.

याच मार्च महिन्यात अमेरिकेने लादलेले युद्ध आणि 'तुल्यबळ' (!) संघावरोबरची भारताची हार या विषयांनी वर्तमान पत्रे भरत राहिली. पैसा मिळतो म्हणून कुत्र्याच्या छत्रीसारखे उगवलेले लेखक क्रिकेट बदल वाढेल ते लिहीत राहिले आणि भांडवलशाही वृत्तपत्रांनी शक्य तेवढं पदरांत पाडून घेतलं. आयुष्यभर कष्ट करून आपण पैसा मिळवत राहतो आणि काही क्षणातच क्रिकेट खेळून (किंबहुना जाहिरात पटात रोल करून) आपले 'लाडके' क्रिकेटपटू आपल्या आयुष्याच्या कमाईच्या दसपट, शंभरपट कमावून जातात ! धनलालसा अगाध आहे.

म्हणूनच काळाचा महिमा आहे म्हणायचं दुसरं काय ?

व्ही. पी. एम्.
# दिशा

वर्ष तिसरे / अंक ५ / एप्रिल २००३

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२ ७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिन्टस,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२ ९१
२५४१ ३५ ४६


## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्रश्न पाण्याचा-जीवन मरणाचा | श्री. पूनम सिंगवी | ३ |
| २) | निमित्त-वांदोडकर महाविद्यालयात प्रा. मोहन आपटेंचा कार्यक्रम | गीतेश शिंदे | ६ |
| ३) | श्रीरामकृष्ण परमहंस - एक तेजस्वी जीवन | श्री. शं. ना. मठ | ८ |
| ४) | वृद्धत्वाचे प्रश्न | श्री. वसंत श्री. देशपांडे | १३ |
| ५) | सार्वजनिक वाचनालय कल्याण | | १७ |
| ६) | ग्रंथ विश्व | श्री. शरद जोशी | २० |
| ७) | पुस्तक परिचय - 'श्रीरामरक्षेतील व्याकरण' | प्रा. अनंत वि. कुलकर्णी | २३ |
| ८) | श्रीमद्‌भगवत् गीता (अध्याय १३ वा) ॥क्षेत्र क्षेत्रज्ञ योग: ॥ | श्रीमती आशा भिडे | २५ |
| ९) | नाटक नाम सूची | सौ. छाया मोहिते व पल्लवी तोडस | ३४ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# प्रश्न पाण्याचा - जीवन मरणाचा

'ठाणे परिसरात भरपूर जलसंसाधन असूनदेखील दरवर्षी पाण्याच्या दुर्भिक्ष्याला सामोरे जावला लागावे ही ठाणेकरांच्या दृष्टीने सर्वच स्तरांवर गांभीर्याने घ्यायची बाब आहे.' या मोजक्या शब्दात हरियालीचे अध्यक्ष श्री. पूनम सिंगवी यांनी ठाणे परिसरातील पाण्याच्या दुर्भिक्षाविषयी बोलताना सांगितले. हरियाली आणि बांदोडकर विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. २ मार्च २००३ रोजी 'ठाणे शहर परिसरातील स्थानिक जलसंसाधनांचे रक्षण आणि उपयोग' या विषयावर एक दिवसीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानिमित्त श्री. पूनम सिंगवी यांच्या विस्तृत मुलाखतीचा गोषवारा त्यांच्याच शब्दात पुढे देत आहोत. - संपादक



मानवाला निर्माण न करता येणारे 'पाणी' नैसर्गिक संपत्तीचा एक प्रमुख घटक आहे. यच्चयावत जीवसृष्टीचे सगळे अस्तित्वच ज्या 'पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश' या पंचमहाभूतांवर अवलंबून आहे. त्यापैकीच पाणी (आप) हा एक घटक आहे. म्हणून त्याला 'जीवन' असेही संबोधले जाते. त्याचा वापर करण्याचा अधिकार केवळ मानवाकडेच नाही. तो अधिकार आपल्या जीवसृष्टीतील प्रत्येक घटकाचा आणि आपल्या भावी पिढ्यांचादेखील आहे. त्यामुळेच त्याचे रक्षण, नियमन आणि वापर फार जबाबदारीने, योजनापूर्वक आणि साकल्याने विचार करून व्हायला हवा.

आपल्या देशात सर्वसाधारणपणे पाण्याचे दुर्भिक्ष्य आहे असे म्हणता येणार नाही. उणीव आहे ती सर्व स्तरांवर - सामूहिक अथवा वैयक्तिक जीवनात - त्याचे जबाबदारीने रक्षण, नियमन आणि वापर करण्याची ! या ठिकाणी सर विन्स्टन चर्चिल यांची एक उक्ती आठवते - 'भारत एक नैसर्गिक साधनसामग्री विपुल प्रमाणात असलेला संपन्न देश आहे. तरीदेखील त्यांत राहणारे बहुसंख्य लोक गरीबच आहेत.' पाण्याच्या बाबतीत, स्वातंत्र्य मिळून पंचावन्न वर्षे झाली तरी अजूनही ही परिस्थिती बदललेली नाही, ही गोष्ट मनाला खिन्न करणारी वाटते.

मुळात आपल्याला पाणी मिळते ते पावसाळ्यात पडणाऱ्या पावसामुळे. तीन महिनेच केवळ पडणाऱ्या या पावसामुळेच जमिनीवरील आणि भूगर्भातील पाण्याच्या साठ्यांचे पुनर्भरण होत असते. त्यामुळे त्याचे रक्षण करणे हे किती महत्त्वाचे आहे हे आपल्या लक्षात यावे आणि म्हणूनच, पावसाळ्यात आकाशातून धरणीकडे झेपावणाऱ्या पावसाच्या प्रत्येक थेंबाकडे जन्माला येणाऱ्या नवजात अर्भकाच्या मायेतूनच बघायला हवे असे मूल राजवाड्यात जन्माला येणारे असो की एखाद्या आदिवासीच्या झोपडीत - ते मूलच असते. त्याचे योग्य त्या पद्धतीने संगोपन व्हायला हवे. कारण ज्या घरात, ज्या परिसरात, ज्या देशात ते मूल जन्माला येते, त्या सगळ्यांचा भावी आधार ते मूलच असते.

पावसाच्या पाण्याकडेदेखील त्याच भूमिकेतून बघायला हवे ते पाणी नदीत पडणारे असो की तलावात, डोंगरावर की रस्त्यावर, माळरानावर की घराच्या छपरावर - शक्यतोवर स्थानिक स्तरावरच त्याचे जतन व्हायला हवे. जेव्हा, जिथे आणि ज्या अपरिहार्य कारणासाठी हे होऊ शकत नाही तेव्हा आणि त्या परिस्थितीतच इतरत्र उपलब्ध

असलेले जास्तीचे पाणी धरणे बांधून, कालवे काढून, जलवाहिन्या टाकून अथवा अन्य मार्गांचा अवलंब करून तुटवड्याच्या भागात न्यायला हवे.

असे करीत असताना ग्रामीण आणि शहरी भागाला वेगवेगळे मापदंड लावून चालणार नाही. शहरी भागात मोकळी जमीन कमी, त्यामुळे पाणी अडविणे आणि साठविणे अधिक महाग पडते म्हणून लांबवरून जलवाहिन्या टाकीत राहून तेथील पाणी कमी खर्चाचे असते. तेवढ्याचसाठी ग्रामीण भागातील पाण्याचे दुर्भिक्ष्य वाढवीत राहून शहरी भागातील लोकांचे चोचले पुरविणे योग्य नाही. यावी फिरवितात ठाणे-मुंबईतील गगनचुंबी इमारतींच्या गच्च्यांवरील कुंड्यांनादेखील पाईपने वाटेल तेवढे पाणी, वाटेल तेव्हा अत्यंत माफक दरात उपलब्ध होते आणि ज्या ग्रामीण परिसरातून ते पाणी आणले जाते त्या परिसरातील बायकांना कमरेवर घडे आणि डोक्यावर कळशा सांभाळीत लांबवरून पायपीट करीत पाणी आणायला लागते. अन्यथा टँकरने येणाऱ्या पाण्यासाठी भरपूर किंमत मोजायला लागते. हे योग्य आहे का? समाजवादाच्या कुठल्या चौकटीत हे बसते ? अशा प्रश्नांवर लोकांचे प्रबोधन करीत, संबंधित लोकांना आपले काम चोखपणे करायला भाग पाडण्याची भूमिका विविध राजकीय पक्ष, वृत्तपत्रे आणि इतर प्रसिद्धीमाध्यमे, सेवाभावी सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था यांनी सातत्यपूर्वक बजावीत राहायला हवी. आज उद्भवलेली पाण्याच्या दुर्भिक्ष्याची समस्या ही केवळ निसर्गनिर्मित नव्हे तर प्रामुख्याने मानवनिर्मित आहे हे आपण समजून घेणं आवश्यक आहे.' ते तसे समजून घेतले तर हे देखील आपल्या लक्षात येईल की या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचे काम केवळ सरकार, शासन अथवा राजकारणातील लोकांवरच सोडून चालणार नाही. केवळ आपापल्या राज्याच्या दृष्टिकोनातून नव्हे तर सर्व देशाच्या हिताचा विचार करून हे काम व्हायला हवे. विचार विश्वाचा, नियोजन देशाचे असले तरीदेखील प्रत्यक्ष कार्याची सुरुवात आणि अंमलबजावणी मात्र त्या, त्या भागातील स्थानिक स्तरावरूनच व्हायला हवी.

आज देशातील तरुणांमधून बुद्धीमत्तेच्या नद्या भरभरून वाहताहेत. मात्र त्यांना स्थानिक पातळीवर रोखण्याचा आणि त्यांचा योग्य तो उपयोग करण्यासाठी आवश्यक तेवढे प्रयत्न न झाल्यामुळे त्यांचा ओघ देशाबाहेर वळू लागला आहे. त्याचप्रमाणे आपापल्या परिसरातील पाण्याचे होत आहे.

ज्याप्रमाणे ज्ञान केवळ चार मोठ्या विश्वविद्यालयीन वाचनालयांमध्ये बंदिस्त करून न ठेवता ते सर्वांना मुक्त करीत तळागाळापर्यंत पोहोचवायला हवे, मुरु द्यायला हवे, त्याप्रमाणे पाणीदेखील खेळू द्यायला हवे, जागोजागी उपलब्ध होईल, असे बघायला हवे. नद्यांवर मोठमोठी धरणे बांधण्यापेक्षा नद्यांमधून पाणी खेळविणे अधिक महत्त्वाचे आणि हिताचे आहे. त्यादृष्टीने देशातील मोठ्या नद्या जोडून त्यातील पाणी सर्वत्र फिरविण्याच्या योजनेचे स्वागतच व्हायला हवे. मात्र असे करताना देखील स्थानिक स्तरावर उपलब्ध असलेल्या पाण्याचा उपयोग आधी त्या त्या ठिकाणच्या गरजा भागवीत राहून, जागोजागी भूगर्भातील पाण्याचे पुनर्भरण होत राहील हे बघणे महत्त्वाचे आहे. या दोन्ही गोष्टी परस्परविरोधी नव्हे तर एकमेकाला पूरक आहेत हे आपण समजून घ्यायला हवे.

समुद्रकिनाऱ्यालगतच्या परिसरात गोडे पाणी योग्य प्रकारे जमिनीत मुरू दिले नाही तर हळूहळू जमिनीखालील गोड्या पाण्याचे प्रमाण, प्रवाह आणि प्रभाव कमी होत राहून, त्यावर खारे पाणी मात करू लागते. त्यामुळे तेथील विहिरींचे पाणी अधिकाधिक मचूळ होऊ लागते. म्हणून किनाऱ्यालगतच्या प्रदेशातदेखील गोडे पाणी खाडीत वाहून जाऊ देण्यापेक्षा ते जास्तीत जास्त प्रमाणात जमिनीत मुरू देणे आवश्यक असते.

समाजजीवनाचे देखील असेच असते, नाही का?

चांगले विचार आणि संस्कार, ज्ञान इ. चांगल्या गोष्टी तळागाळातील लोकांपर्यंत न पोहोचविता अथवा मुरू न देता, वरवरूनच वाहू दिल्या तर समुद्रात विलीन होऊन सातासमुद्रापलीकडे जातात. आपल्या येथील समाजजीवन मात्र प्रदूषित होऊन बसते ! आणि म्हणूनच इतर सर्व चांगल्या गोष्टींप्रमाणेच पाण्यासारख्या अमूल्य नैसर्गिक साधनसमृद्धीचे स्थानिक पातळीवरून अधिकाधिक जतन आणि वापर होणे आवश्यक असते. एखादी गोष्ट अथवा वस्तू देशातील तशाच उत्पादनापेक्षा स्वस्त पडत असली, तरीदेखील देशांतर्गत असलेल्या इतर प्रश्नांचा विचार करता आपल्याला देशी उत्पादनास चालना आणि संरक्षण देणे आवश्यक वाटते. तसेच स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेल्या पाण्याच्या स्रोतांचेदेखील आहे. इतरत्रचे पाणी आणण्याआधी त्याचा पूर्ण विकास आणि वापर व्हायलाच हवा.

दुर्दैवाने आज आपल्या परिसरात असे होताना दिसत नाही. संबंध कोकणपट्टीतील पाणी आज त्याचा संपूर्ण अथवा योग्य तो उपयोग न होता ठिकठिकाणच्या खाड्यांमधून अरबी समुद्राला जाऊन मिळत आहे. पावसाळ्यात सरासरी २०० मि. मी. पाऊस पडत असलेल्या ठिकाणी डिसेंबरपासूनच 'घट कमरेवरी' यायला लागले आहेत. नद्यातले पाणी संपून डोळे मात्र भरून यायला लागले आहेत !

ठाणे शहर आणि परिसर या परिस्थितीचे उत्तम उदाहरण आहे. उल्हास, काशेळी आणि प्रामुख्याने येना नदी, त्यांच्यात येऊन मिळणारे डोंगर-दऱ्यातून धवधवत येणारे असंख्य ओढे-नाले आपली अमूल्य नैसर्गिक जलसंपत्ती वीस कि.मी. लांबीच्या खाडीतून समुद्रात नेऊन सोडताहेत. गोड्या पाण्याचे साठ तलाव एकेक करून नष्ट होताहेत. उर्वरित तलावांपैकी तीन तलाव सोडले तर एकाही तलावाचे पाणी आग विझविण्यासाठी देखील वापरता येणार नाही एवढे प्रदूषित आणि शेवाळ व वनस्पतींनी समृद्ध झालेले. याला कोण जबाबदार ?

पाणी वाया घालविणे अथवा ते प्रदूषित करून कुठल्याही कामासाठी वापरता न येण्यासारखे करून ठेवणे हे कुठल्याही देशाला आर्थिकदृष्ट्या न परवडणारे आहे. कारण त्याची निर्मितीक्षमता अपार आणि जीवनदायित्व अमूल्य असून मानवाला त्याची पुनर्निर्मिती करता येत नाही.

नैतिकदृष्ट्या ते पाप आहे. कारण पाण्याचा वापर करण्याचा अधिकार फक्त मानवाचाच नाही तर यच्चयावत जीवसृष्टीचा आहे. गरजेपुरते ते वापरण्याचा अधिकार या जीवसृष्टीतील प्रत्येक घटकांचा असला तरी ते वाया घालविण्याचा अथवा प्रदूषित करण्याचा मत्र कोणालाही नाही आणि विध्वंसाचे कार्य या अवनीतलावर मानवाशिवाय दुसरा कोणीही करीत नाही.

भारतापुरते बोलायचे तर कायद्याच्या दृष्टिकोनातून तसे करणे हा गुन्हा आहे. भारतीय राष्ट्रघटनेचे उल्लंघन करणे आहे. राष्ट्रघटनेतील नागरिकांचा या मुलभूत कर्तव्याचा अंतर्भाव असलेल्या कलम ५१ अ मधील एक तरतूद अशी आहे.

५१ अ 'भारताच्या प्रत्येक नागरिकाचे मूलभूत कर्तव्य असेल की -

(जी) परिसरातील वनसंपत्ती, तलाव, नद्या, वन्यजीव आदींनी युक्त पर्यावरणाचे रक्षण करणे आणि सर्व जैविक सृष्टीचे भान ठेवणे...'

याचे पालन सार्वजनिक स्तरावर तसेच वैयक्तिक पातळीवर देखील व्हायला हवे आहे. गावा-गावातून, घरा-घरातून, प्रत्येक व्यक्तीकडून वाया जाणारे पाणी, पुनर्लागवड न करता विनाकारण तोडले जाणारे वृक्ष, परिसरातील जळते डोंगर यांची वेळीच दखल घेऊन हे प्रकार थांबविण्यासाठी सर्व स्तरावरील नागरिकांनी एकत्रितरित्या अर्थपूर्ण प्रयत्न

(पान क्र. १२वर)

# निमित्त - बांदोडकर महाविद्यालयात प्रा. मोहन आपटेंचा कार्यक्रम

*प्रसिद्ध शास्त्रज्ञ व विज्ञानविषयक लेखन करणारे प्रा. मोहन आपटे बांदोडकर महाविद्यालयात अलिकडेच एका कार्यक्रमासाठी येऊन गेले. या निमित्ताने बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थी गीतेश याने त्यांची घेतलेली ही मुलाखत - संपादक*

जन्माला आल्यापासूनच माणूस काही ना काही तरी शोधत असतो आणि ही शोध घेण्याची प्रवृत्तीच काहींना शास्त्रज्ञ बनवते. अशाच एका नामवंत शास्त्रज्ञांना भेटण्याची माझ्या महाविद्यालयीन जीवनात मला संधी मिळाली आणि यासाठी मी माझ्या महाविद्यालयाचा ऋणी राहीन.



प्रा. मोहन आपटे

पदार्थ विज्ञान या विषयातून त्यांनी 'एम.एससी.' पदवी मिळवली. भारतीय विद्याभवन व सोमाणी महाविद्यालयात त्यांनी पदार्थ विज्ञान विभाग प्रमुख पदावरती काम पाहिले. तसेच मुंबई विद्यापीठात ते सिनेट सदस्य म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी आजवर एक नाही, दोन नाही तर गणित, खगोलशास्त्र, विज्ञान इत्यादी विविध विषयांवर तब्बल पंचवीस पुस्तके लिहिली. त्यांच्या 'अणवस्त्रांचा मृत्युघोष', 'अग्निनृत्य' व 'अवकाशातील भ्रमंती' या पुस्तकांना राज्यशासनाचा उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार देखील मिळाला. त्यांचे 'डायनॉसॉर्स' हे पुस्तक मी लहानपणी वाचले होते व तेव्हापासूनच मी त्यांचा चाहता बनलो. बरोबर, त्यांच नाव आहे, 'प्रा. मोहन आपटे'. अशा ख्यातनाम शास्त्रज्ञांशी केलेली ही लहानशी बातचीत.

**काही दिवसांपूर्वीच वृत्तपत्रातून शुक्रावरती जीवनाचे अवशेष सापडल्याचे वाचले, त्याबद्दल आपण आम्हांस कोणते मार्गदर्शन करू शकाल?**

फार पूर्वीपासूनच शास्त्रज्ञांना शुक्राच आकर्षण, त्याच्याबद्दल जिज्ञासा वाटते. १९९० साली नासाने शुक्राच्या संशोधनासाठी 'मॅगेलेन' नावाचे यान अंतरिक्षात सोडले व तेथूनच त्याच्या पुढील संशोधनास खऱ्या अर्थाने सुरवात झाली. आज आपल्याकडे जितकी माहिती उपलब्ध आहे त्यावरून शुक्रावरती काही प्रकाशवर्षांपूर्वी जीवनाची शक्यता किंवा जीवनासाठी अनुकूल असे वातावरण होते, असं लक्षात येईल. परंतु आज या ग्रहाचं तापमान ५५० केल्विन इतकं आहे. तसेच येथील कार्बन डाय ऑक्साईड वायूचे प्रमाण ९५% इतके आहे. त्यामुळे अशा वातावरणात मानवाला जगणं अशक्य आहे. तसेच या स्थितीत कोणतीही सुधारणा न होता तेथील तापमान वर्षानुवर्षे वाढतच राहणार आहे. त्यामुळे शुक्रावरील वातावरण मानवास अत्यंत प्रतिकूल आहे.

**खगोलशास्त्रातील अनेक प्रश्न आजही अनुत्तरित आहेत. या प्रश्नांच्या संदर्भात आपल्याकडे झालेले संशोधन पुरेसे आहे असे आपणास वाटते का?**

खगोलशास्त्रातील संशोधनात भारताचा वाटा हा मोलाचा आहे. आज अनेक भारतीय नासात खगोलशास्त्रावर संशोधन करतात. भारतात काही प्रमाणात

संशोधन करण्यात अडचणी येतात, कारण भारतात अजून तितकीशी आधुनिक उपकरणे उपलब्ध नाहीत. तसेच अशा उपकरणांची किंमत कोटींच्या घरात असल्यामुळे येथील शास्त्रज्ञांना ती घेणे देखील परवडत नाही. असे जरी असले तरी भारतीय शास्त्रज्ञ एखाद्या विषयाची थिअरी म्हणजेच सिद्धांत योग्य रीतीने मांडू शकतात. तसेच या सिद्धांतासाठी लागणारी माहिती अथवा संशोधन इंटरनेटद्वारा अगदी सहज उपलब्ध होऊ शकते, त्यामुळे खगोलशास्त्रात आपण योग्य ते संशोधन करू शकतो, असं मला वाटते.

**नवीन संशोधकांना संशोधनाच्या क्षेत्रात असणारा वाव व त्याचे स्वरूप याबद्दल आपण आम्हास काय सांगू शकाल ?**

नवीन संशोधकांना या क्षेत्रात खूपच वाव आहे. कारण आजवर अनेक प्रश्न अनुत्तरित आहेत. उदाहरणार्थ, 'डार्क मॅटर' म्हणजे काय? लोह किंवा युरेनियम सारखे जड धातू कसे तयार होतात ? तीन मिती खेरीज आणखी एखादी मिती अस्तित्वात आहे का? विश्वाची रचना कशी झाली? प्रोटॉन हा स्थिर आहे का? तसेच न्यूटनने जरी गुरुत्वाकर्षणाचा शोध लावला असला तरी त्याबद्दलचे पुढील संशोधन अजून सुरू आहे. अशा अनेक प्रश्नांवरती नवोदितांना संशोधन करता येऊ शकेल. तसेच वरील प्रश्नाचे उत्तर शोधल्यास मिळणारी पारितोषिकांची रक्कम देखील कोटींच्या घरात आहे. त्यामुळे आजची तरुण पिढी संशोधन क्षेत्राचा विचार करू शकते.

**विज्ञान आणि खगोलविज्ञान यांचा प्रसार सर्वसामान्य माणसांमध्ये व्हावा, यासाठी आपण कोणते उपक्रम सध्या करीत आहात ?**

सर्वसामान्य माणसांमध्ये खगोल विज्ञानाचा प्रसार करण्यासाठी आम्ही आकाशदर्शनाचे कार्यक्रम हाती घेतच असतो. ज्यावेळी वृत्तपत्रातून उल्कापाताची, धुमकेतू दिसण्याची, सूर्यग्रहणाची शक्यता वर्तवली जाते, तेव्हा अनेक उत्साही लोक ते पाहण्यासाठी प्लॅनेटोरियममध्ये येतात. तसेच सध्या प्लॅनेटोरियमतर्फे 'Foundation Course in Astronomy' आणि 'Advanced Course in Astronomy' अशा दोन आधुनिक कोर्सेसचे प्रशिक्षण देखील दिले जाते त्यामुळे या कोर्सेसद्वारे सर्वसामान्यांच्या ज्ञानात नक्कीच भर पडते.

**'शतक शोधांचे' हे आपले खूप गाजलेले पुस्तक आहे, असं पुस्तक लिहावं असं आपणास केव्हा वाटले?**

सुरुवातीला १९९८ मध्ये मी, या शतकात लागलेले काही महत्त्वाचे शोध, त्यासाठी शास्त्रज्ञांनी केलेले अथक परिश्रम यांचा आढावा देणारी एक छोटेखानी पुस्तिका तयार केली व ती प्रकाशित करण्यासाठी 'राजहंसच्या प्रकाशकांना' दाखवली असता त्यांनी मला या शतकात लागलेल्या सर्व शोधांबद्दलची माहिती देणारी एक आगळी-वेगळी पुस्तिका आपण प्रकाशित करूया, असं म्हटले. ही कल्पना मला खूपच योग्य वाटली व त्यावरती मी काम सुरु केले. त्यासाठी मला इंटरनेटद्वारा खूप माहिती मिळाली आणि संपूर्ण शतकातील अनेक शोधांबद्दल माहिती देणारी ७०० पानी पुस्तिका तयार झाली. हे पुस्तक लिहिणं हे देखील एक मोठं संशोधन होतं. कारण काही गोष्टी आज आपल्या रोजच्या वापरातील असल्या तरी ते शोध कोणी लावले ते सामान्य माणसांना माहीत नसते. तसेच काही शोध जगाच्या दृष्टीआड राहिले; त्यामुळे अनेकांच्या ज्ञानात भर घालणारी पुस्तिका लिहिल्याबद्दल मला समाधान वाटते.

**गीतेश गजानन शिंदे**

२०३, स्वप्नजा सोसायटी,
भोयी आळी, मावळी मंडळ हॉल जवळ,
टेंभी नाका, ठाणे (प.)-४०० ६०१.
दूरध्वनी :- २५३७९५११

# श्रीरामकृष्ण परमहंस-एक तेजस्वी जीवन

*श्रीरामकृष्ण परमहंस यांनी आपल्या जीवनातल्या प्रयोगांनी सिद्ध केलेल्या महत्त्वपूर्ण गोष्टींचा मागोवा या लेखात घेतला आहे. - संपादक*

**विज्ञान युगाचा आरंभ -**

साधारणपणे चौदाव्या शतकाच्या मध्याला म्हणजे ख्रिस्त शक १४५३ साली तुर्कांनी कॉन्स्टांटिनोपल हे शहर लुटले. तेथील विद्वान परागंदा झाले. ते जेथे जेथे गेले तेथे तेथे ग्रीक विद्या व कला घेऊन गेले. त्यातीलच एका विद्या शाखेचा प्रसार विशेषत्वाने झाला. ती विद्या शाखा 'नॅचरल फिलासॉफी'. पुढील काळात यालाच आधुनिक विज्ञानाचे स्वरूप प्राप्त झाले. विज्ञान पूर्वीपासून होतेच, परंतु या कालानंतर या विद्येला, विशेषत्वाने चालना मिळाली म्हणून इथून विज्ञान युगाला आरंभ झाला, असे म्हणतात.

जे डोळ्यांनी पहाता येते, कानांनी ऐकता येते, त्वचेने स्पर्श करता येते, नाकाने ज्याचा वास घेता येतो अशा प्रकारे जे जे काही आपल्या इंद्रियामार्फत जाणले जाते तेच सत्य व इंद्रियानी जे जाणता येत नाही ते सारे खोटे. त्याला सत्य म्हणता येणार नाही. इंद्रियानी जाणले जाते तेच सत्य आणि त्यालाच जीवनात काही मूल्य प्राप्त होऊ शकेल. थोडक्यात अतींद्रिय अनुभवाने जाणल्या जाणाऱ्या धर्म, तत्वज्ञान, इत्यादींचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन ज्या तत्त्ववेत्त्यांनी सिद्धांत मांडले. उदाहरणार्थ, ईश्वर, आत्मा, अंतिम सत्य, मोक्ष अमरत्व या संकल्पना केवळ थोतांड, विज्ञान विसंगत अतएव त्याज्य अशी एक विचार सरणी प्रबळ झाली. या विचार सरणीचा वरचष्मा झाल्याने ईश्वर, आत्मा, आदी गोष्टी मागे पडल्या. केवळ विज्ञानाधिष्ठित जीवनाची प्रतिष्ठापना करण्यात आली. हाच भौतिकवाद होय. या वादाचे चार प्रमुख भाग असे आहेत. इहलौकिक, प्राकृतिक, ऐहिक आणि इंद्रियनिष्ठ या गोष्टीच मानवाच्या गतीचे आणि प्रगतीचे प्रवर्तक ठरले.

**भारतीय विचारधारा -**

भारतातील जीवन पद्धति वैदिक विचारातून प्रवर्तित झालेली आहे. मनाची प्रेरणा प्रामुख्याने चार गोष्टीने प्रवर्तित होतात. हे जाणून समाज प्रमुखांनी एक सिद्धांत मांडला. त्याचे नाव पुरुषार्थ चतुष्टय. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष. धर्म-आचार, कर्तव्य पालन, पुण्य कृत्ये नीती इत्यादी. अर्थ-उपभोगाच्या सर्व साधनांचा संग्रह. काम-प्रत्यक्ष उपभोग व तृप्ती. मोक्ष-आत्मानुभूती. यातील मोक्ष हा पुरुषार्थ प्रमुख गणला गेला. यासाठी इतर तीनही पुरुषार्थ प्रवर्तित करणे आवश्यक अस मानले गेले.

**आजची कामप्रधान संस्कृती -**

इंद्रियनिष्ठ संस्कृतीने मोक्ष या कल्पनेवर घाला घातला. याचा परिणाम काम संस्कृती बनली व जीवनाचे सारे स्वरूप बदलून गेले. काम हा श्रेष्ठ ठरला. असंयमित जीवनामुळे जीवनातील समतोल पूर्ण उधळला गेला. भोग प्रवणता वाढीला लागली. संघर्ष, असंयमित जीवन, त्यामुळे अशांत व असमाधानकारकता आणि द्वेषावर आधारित जीवन निर्माण झाले. जहरी द्वेषावर आधारित झालेली विचार सरणी ऐहिक या गोड नावाखाली निर्धास्त वावरू लागली. हजारो मानवाना कंठस्नान घालण्याच्या मानवी कृतीला जीवनक्रांती असा भव्य शब्द प्राप्त झाला. जग वारा प्यालेल्या गायीच्या वासरासारखे सुसाट धावू लागले आहे. कुठे? कशासाठी? ही धाव आहे. कुणालाच समजेनाशी झाली आहे. सर्व सामान्य मानव केवळ आश्चर्याने

आगतिकतेने पहात राहिला आहे. विज्ञानाने जी काही प्रगती करून जीवन सुसह्य केले ते या काम संस्कृतीने, सामान्यांच्या जीवनात न पोचू देण्याचे कार्य केले आहे. त्यांचे जीवन भकास अगतिकच राहिले आहे. आज वाफ, विद्युत आणि वायु (पेट्रोल) यांच्या सहाय्याने अजस्र यंत्रे उभी करून प्रचंड उत्पादन होत असतानाही सामान्य दृष्ट्या मानवाचे जीवन सुखी झालेले नाही. जडवादाने मानवाचा पराभव केला आहे याचे कारण एकच. या भोगवादी संस्कृतीने आत्महीनता निर्माण केली. या आत्महीनतेमुळेच जीवन सुखी होऊ शकले नाही.

**श्री रामकृष्णांचे कार्य -**

शिक्षणाच्या माध्यमातून हा जडवाद प्रसारित होऊ लागला. भारतात लॉर्ड मेकॉले साहेबानी इंग्रजी शिक्षणाचा पाया घातला. त्या इंग्रजी भाषेद्वारे त्यांचा जडवाद खिस्त शक १८३६ पासून भारतात घुसला. त्याच सुमारास भारतीय क्षितिजावरती या वैज्ञानिक जडवादाला त्याच भाषेत आत्मचैतन्याशी सांगड घालून मानवाच्या ठिकाणी असलेली आत्महीनता काढून टाकून विज्ञानाला परिपूर्णता आणण्याचे जणू काही आव्हान स्वीकारण्याच्या हेतूनचे एक शक्ती जन्माला आली. त्या शक्तीचे आणि व्यक्तीचे नाव श्री रामकृष्ण परमहंस. विज्ञानाशी झुंज न देता वा त्याला वांझ न ठरविता त्याच्या ठिकाणी असलेली आत्महीनता काढून टाकून ती परिपूर्ण व्हावी या दृष्टीने श्री रामकृष्णानी आपल्या जीवनद्वारे या जडवादाला चोख उत्तर दिले.

**श्री रामकृष्णांनी केलेले प्रयोग -**

रामकृष्णांनी हे आव्हान स्वीकारले. आपल्या जीवनातच प्रयोग करून वैज्ञानिक जडवादाला त्यांनी योग्य उत्तर दिले. १८ फेब्रुवारी १८३६ फाल्गुन शु. २ या दिवशी कामारपूर या कलकत्याजवळील लहान खेड्यात एका गरीब परंतु पुण्यवंत मातापित्यांच्या पोटी हे बालक जन्माला आले. हे बालक विलक्षण होते. अवघ्या ६-७ व्या वर्षी या बालकाला भाव समाधी लागली.

रामकृष्णांचा प्रयोग प्राकृतिक गोष्टी संबंधी नव्हता. वैज्ञानिक, प्रकृतीशी संवाद जुळवतात तर रामकृष्णांचा संवाद या प्रकृतिद्वारे चिरंतन सत्याचे, किंबहुना ज्याचा विलास म्हणजे ही प्रकृती आहे, अशा मूळ चैतन्याशी होतात. वैज्ञानिकांच्या मनोभूमिकेतून जडवाद पसरला. या जडवादाने सारे जीवन भोगमय व संघर्षमय केले. श्री रामकृष्णांच्या प्रयोगातून विज्ञानानी निर्माण केलेली आत्महीनता दूर करून त्यातील अपूर्णता घालवून जीवन आत्मप्रत्ययी बनवून सफल, शांत, शुद्ध, तुष्ट, पुष्ट, समृद्ध व्हावे, यासाठी भूमिका तयार केली.

रामकृष्णानी शाळेत मिळणाऱ्या शिक्षणाला केव्हाच रामराम ठोकला. त्यानी आपल्या मोठ्या भावाला नम्रपणे व नेटाने उत्तर दिले. मला भाजी-भाकरी मिळवून देणारी विद्या नको. मला अशी विद्या पाहिजे, ज्या योगे मानवाला ज्ञान होईल व त्याचे जीवन कृतार्थ होईल आणि खरोखरच त्यांच्या जीवनात अशी संधी आली.

**दक्षिणेश्वरी येथील प्रयोग -**

कलकत्यातील एक धनाढ्य श्री. राणी रासमणी. हिने दक्षिणेश्वरी कालीमातेचे मंदिर बांधले. तिला या मंदिरासाठी पुजारी हवा होता. श्री रामकृष्णांनी पुजारीपण स्वीकारले. हा पुजारी अद्वितीय निघाला. देवीची स्वस्थपणे पूजा करून चरितार्थ चालविणारा हा पुजारी नव्हता. त्याला ओढ होती जगन्मातेची. तो म्हणे- आई, मला धन, दौलत, मान, मरातब काही नको. मला फक्त तुझे दर्शन हवे. तू हवीस. आई लोक तुला त्रिभुवन सुंदरी म्हणतात. तू खरोखरच तशी आहेस का? मला दर्शन का बरे देत नाहीस? तू सर्वांचे रक्षण करणारी, पोषण करणारी असे म्हणतात. त्रिभुवनात तू संचार करणारी असे म्हणतात. ही सारी कवि कल्पना का? तुझे वर्णन एक थोतांड आहे का? मला का बरे प्रत्यय येत नाही. लोक वा ग्रंथ काही वर्णोत मला काय

त्याचे ? तुझे प्रत्यक्ष दर्शन त्यांच्यावर थोडेच अवलंबून आहे. मला फक्त दर्शन हवे. मी व्याकुळ झालेलो आहे. तुझ्या दर्शनाशिवाय मला चैन पडत नाही. असा विलाप करीत श्री रामकृष्णानी जवळ जवळ ५-६ वर्षे चालविली त्याना अंगाचा दाह असह्य होत असे, आईच्या कृपेने वाचलो असे ते म्हणत.

रोज सांज आरतीची घंटा झालेली ऐकताच त्यांच्या अश्रुधारा आणखी वाढत. ते म्हणत - आई, आजचाही दिवस फुकट गेला, तुझे दर्शन झाले नाही. आई तू दर्शन देणार नसशील तर मीही यापुढे जीवन धारण करणार नाही, असा निश्चय करून एके दिवशी देवळात गेले. देवीच्या बाजूला एक खड्ग होते. त्यांची नजर त्यावर स्थिर झाली. हे खड्ग आपल्या कामाला येईल, असा विचार करून त्यावर हात ठेवण्याचा अवकाश लख्कन प्रकाश झळकला आहे, सारे काही त्या प्रकाशात विरून गेले. तो खड्ग नाही, ती देवी नाही, ते देऊळ नाही, स्वत: रामकृष्ण नाही. सारे प्रकाशमय. 'एकात्म प्रत्यय सारं प्रपंचोपशमं शान्तं अद्वैतं चतुर्थं मन्यन्ते स आतमा ।' या मुंडक उपनिषदातील वर्णनाप्रमाणे एकात्म अनुभूती आणणारी, सर्व विविधता नाहीशी करणारी, शांत, एकमेव चिरंतन, सुर्यावस्थेतील अद्भुत असलेल्या तत्वाचे दर्शन - आत्मदर्शन झाले. स्मृति नाहीशी झाली. दोन दिवस रामकृष्ण निश्चेष्ट होते. इंद्रियगम्य तेच खरे असे मानणाऱ्या विज्ञानाला आपल्या अतींद्रिय प्रत्ययाने त्याने पहिला धक्का दिला. प्रत्यक्ष अनुभवाने त्यांचे जीवन शांत झाले.

**आणखी काही प्रयोग -**

ही प्रचंड जिज्ञासा इथेच न थांबता विलास ज्या विविध रुपानी नटलेला आहे ते सारे पडताळून पाहण्याचा, प्रत्यक्ष अनुभव घेण्याचा त्यांनी चंग बांधला. कारण प्रत्यक्ष अनुभूती प्राप्त झाली असताही त्याच प्रकारची अनुभूती पुन: घेण्याच्या मागे विज्ञाननिष्ठ जीवनच खरे मानणाऱ्या जडवादी लोकाना आपल्या प्रयोगातून हा आत्म प्रत्यय सिद्ध होत असल्याचे दाखवावयाचे होते. म्हणूनच श्रीरामकृष्णानी प्रयोगादाखल आपल्या जीवनाची पुढील बारा वर्षे चालविली. या अवधीत त्यानी बरेच प्रयोग केले. इतकेच नव्हे परधर्म स्वीकारूनही त्याही धर्मांच्या आश्रयाने अशीच अनुभूती प्राप्त होऊ शकते याचाही प्रत्यय आणून दिला.

विज्ञानाची काही विशिष्ट अंगे आहेत. विमुक्त जिज्ञासा, सत्यासाठी निडर धांडोळा, प्रयोग, प्रत्यक्ष प्रमाण, कसोटी, प्रात्यक्षिक पडताळा व सर्वसामान्य नियम. या साऱ्या अंगांचा विचार करता श्री रामकृष्णांनी केलेले प्रयोग या निकषावर पूर्णपणे उतरले आहेत असे ध्यानात येईल.

**विमुक्त जिज्ञासा -**

याचे लक्षण सगळ्या पूर्वग्रहापासून मुक्त असणे, खुळचट कल्पनांना बाजूला सारणे, कोणत्याही प्रमाणांचा आधार न घेणे. निव्वळ अन्वेषण. अशा प्रकारची अन्वेषणा श्री रामकृष्णानी केलेली आढळते. कालीमातेच्या दर्शनासाठी कोणत्याही ग्रंथाचा आधार न घेता केवळ आपल्या व्याकुळतेच्या बळावर समाधी पर्यंतची अवस्था गाठून निव्वळ दर्शन लाभ प्राप्त केला. पूर्वग्रह, खुळाचार बाजूला सारले. याचे हे उद्बोधक उदाहरण आहे.

दुसरे उदाहरण श्री रामकृष्ण जातीने हिंदु, कर्माने पुजारी, तरी देखील इस्लामधर्म स्वीकारताना त्याना पूर्व संस्काराचे भय वाटले नाही. कारण त्याना निखळ सत्यान्वेषण करावयाचे होते. त्यासाठी एका मुसलमान फकीराकडून इस्लाम दीक्षा घेतली. कासोटा विहीन कपडे, अल्लाचा जप, नमाज आदी सुरू केले. आईचे दर्शनही त्याकाळापुरते बंद केले. अशा पद्धतीने इस्लाम धर्माचा आश्रय करून अंतिम अवस्था-आत्मदर्शन गाठली. ख्रिस्तधर्माबद्दलही हाच अनुभव त्यांनी घेतला. सत्यासाठी निडर धांडोळा आणखी काय असू शकेल? सत्यान्वेषण करताना त्याना कशाबद्दलही भीती वा कष्ट वाटले नाहीत.

अनेक प्रयोग करून पाहताना सहा भावांचा - सख्य, दास्य, मधुरा आदी भक्तीच्या प्रयोगाने आत्मदर्शन घेतले. अद्वैत वेदान्तानुसार तोतापुरी महाराजाकडून संन्यास दीक्षा घेतली. निर्विकल्प समाधी प्राप्त करून घेतली.

**प्रत्यक्ष प्रमाण -**

स्वामी विवेकानंद सुरुवातीस निरीश्वरवादी होते. श्री रामकृष्णांच्या सान्निध्यात ते ईश्वरनिष्ठ झाले. स्वामीजी प्रत्येकाला विचारावयाचे महाराज आणि ईश्वर पाहिला आहात काय? हा प्रश्न ऐकताच मी मी म्हणणारे लोक गडबडून जायचे. पण दक्षिणेश्वरी राहणारा एक महापुरुष त्याना भेटला. जो शांतपणे म्हणता झाला, होय बाळ, मी ईश्वर पाहिला आहे. तुला आता पाहातो त्याहून अधिक स्पष्ट मी त्याला पाहात आहे. तुला पाहण्याची इच्छा आहे? माझ्या म्हणण्याप्रमाणे वाग. विवेकानंद अवाक् झाले. त्यांना प्रत्यक्ष प्रयोगाने ईश्वर दर्शन घडले.

**कसोटी -**

एकदा डॉ. महेद्रनाथ सरकार व श्री रामकृष्ण बोलत बसले होते. बोलता बोलता श्री रामकृष्णाना समाधी लागली भाव समाधी ही भावना भावावस्था असते. हीच निर्विकल्प अवस्था. इथे 'मी' हा भाव नाहीसा होतो. सबोध वा अबोध सगळ्या क्रिया थांबतात. किंबहुना हृदय स्पंदन हे ही 'मी' पणाच्या भूमिकेतून असल्याने तेही थांबते. मृत्यूपूर्वी हृदय स्पंदन थांबण्याची ही एकमेव प्रकिया तरी माणूस जिवंत राहतो, असे श्री रामकृष्ण नेहमी सांगत. याची परीक्षा घेण्यास हा योग्य काळ आहे हे पाहून डॉ. महाशयानी त्याची तपासणी केली. सर्व शरीर निश्चेष्ट होते. डोळ्यात बोट घालून पाहिले. हृदयावर नलिकायंत्र ठेवून ठोके तपासले. सारे शांत. कुठेच काही हालचाल नाही. काही वेळाने श्री रामकृष्ण द्वैतावस्थेत आले. पुन: सारे पुर्ववत् सुरू झाले. डॉ. महाशयानी हात जोडले, महराज आमचे वैज्ञानिक ज्ञान आपल्यापुढे थिटे पडले. निश्चेष्ट अवस्था व हृदय स्पंदन थांबले असतानाही आपण कसे जिवंत राहू शकता? आमच्या विज्ञानाला हे अगम्य आहे.

**पडताळा -**

एकदा श्री रामकृष्ण काही शिष्यांबरोबर गप्पा मारीत असता सहज गोष्ट निघाली त्यावेळी ते सारदानंदाना म्हणाले - कायरे बायबल वाचले आहेस? येशूचे वर्णन बायबलात कसे आले आहे? सारदानंद म्हणाले - बायबल वाचले आहे. त्यात शारिरिक वर्णन नाही. मात्र एक गोष्ट सत्य आहे. येशू ज्यू वंशातले ते गोरेपान व सुंदर असावेत; श्री रामकृष्ण म्हणाले अरे मी त्याचे दर्शन घेतले आहे. त्याचे नाक जरा चपटे आहे. सारदानंद लिहितात आम्ही सारे गप्प बसलो. ठाकुरांच्या निधनानंतर काही काळाने आम्हास येशूचे वर्णन एका पुस्तकात वाचावयास मिळाले. खरोखरच त्यांचे नाक चपटे असल्याचे वर्णन त्यात होते. भाव दर्शनातील सत्यतेबद्दल हा पडताळा पाहून आम्हास आनंद झाला.

अशाप्रकारे अनेक प्रयोगानी आपले जीवन व्यतीत करून ते एका निष्कर्षाप्रत आले. जीवनाचे अंतिम ध्येय, ईश्वर दर्शन, भगवत् प्राप्ती. सर्व धर्म श्रेष्ठ. ईश्वराच्या व्यक्त रूपातल्या आविष्काराचा अनुभव करून देणे हेच धर्माचे खरे कार्य. तोच खरा धर्म. धर्मासंबंधी केली जाणारी बडबड त्यातून होणारी गडबड ही वरवरची होय.

आपल्या गोष्टीवर निष्ठा ठेवून इतरांच्या गोष्टी बद्दल माणुसकी दाखवा. लक्षात ठेवा, तुम्ही कोठे जाणार आहात; तिथेच हे सारे मार्ग येऊन मिळतात. अशा पद्धतीने सत्यान्वेषण तुम्ही स्वत: करू शकता. केवळ जिज्ञासा व व्याकुळता मात्र पाहिजे. त्या जोरावर या जन्मातच ईश्वर लाभ होऊ शकतो.

**आजच्या मानवासंबंधी -**

जीवनातील समतोल पुन: प्रस्थापित होणे अगत्याचे आहे. मात्र मानव केवळ अगतिक झाला आहे. हे बदलणे आवश्यक आहे. दृष्टिकोन बदलणे आवश्यक. केवळ इंद्रियनिष्ठ गोष्टीच सत्य. त्यानाच जीवनात सारे मूल्य दिल्याने ही अवस्था झाली आहे. जीवनात स्थिरता, समतोलपणा, समाधान शांती, समृद्धि निर्माण व्हावी असे प्रत्येकाला वाटते. त्यासाठी जीवनाचा समग्रतेने विचार करणे आगत्याचे आहे. ईश्वर, आत्मा, अंतिम सत्य, हेच आपले जीवन ध्येय असावयास हवे. याच्यातून मी, जगत् ईश्वर हे सारे काही एका विशाल तत्वाचे अंगभूत अंग आहोत हे ध्यानात येईल. त्यामुळे एक प्रकारचे साहचर्य व सहजीवन निर्माण होऊ शकेल. हे निर्माण झाल्यासच सृष्टीतील यच्चयावत् गोष्टीबद्दल आपुलकी निर्माण होईल. या भावनेतून संयमित जीवन उभे राहू शकेल. स्वैराचारी जीवन ही भावना शून्यता व आत्महीनता यातून निर्माण झालेली घटना आहे. हा आत्मप्रत्य- आत्मवत् सर्व भूतेषु ही भूमिका तयार करतो. यातून आपोआपच जीवन संयमित होते.

**तेजस्वी जीवन -**

संयमित जीवनच तेजस्वी जीवनाची वाटचाल होय. स्वैर जीवन हे अध:पतित जीवन होय. एखादी व्यक्ती अनैतिक मार्गाने पैसा मिळवून गबर होते व ती व्यक्ती मौज करते हे पाहून दुसऱ्या एखाद्या व्यक्तीच्या अंत:करणात आपणही असा व्यवहार करून मौज का लुटू नये असा विचार येणे साहजिक आहे. विचाऱ्यावर लहानपणापासूनच नैतिकतेचे संस्कार झाल्याने असे जीवन तो आचरू शकत नाही. परंतु मनातून तो खट्टू असतो. असा विचार सामान्य माणसाला येणे साहजिक आहे. परंतु तो योग्य आहे हे तपासून घ्यावयास हवे. नीति, संयमित जीवन उभे करते. संयमित जीवनाद्वारे जीवनामध्ये तेजस्विता येते. किंबहुना तेजस्वी जीवन जगण्यासाठीच, संयमित जीवनाचा अवलंब करावयाचा असतो. त्यासाठी नीति, धर्म आचरण, सदाचार. अनैतिकपणे वागून गबर वा श्रीमंत झालेला माणूस कितीही पैशाने मोठा असला तरी तेजस्वी जीवनाच्या दृष्टीने त्याचे जीवन अध:पतीतच. ते जीवन शून्यवत होय. इमारतीच्या उंचावर जरी कावळा जाऊन बसला तरी गरुड थोडाच होणार. 'प्रासाद शिखरस्थोऽपि काको न गरुडायते।' हे ध्यानात ठेवले पाहिजे. आपले जीवन तेजस्वी होण्यासाठी आपली सारी धडपड असली पाहिजे. संतचरित्रे यांचीच निदर्शक असतात. असे तेजस्वी जीवनच सुखी, समाधानी, पूर्ण, समृद्ध असू शकते आणि हाच मानव स्वत:चे व जगाचे कल्याण साधू शकते. 'आत्मन: मोक्षाय जगत् हिताय च' । हेच खरे जीवन होय. हाच बोध, हाच संदेश, हेच श्री रामकृष्ण यांच्या जीवनाचे सार. हे समजून घेतले तरच त्यांचे पुण्यस्मरण योग्य प्रकारे करतो आहोत, असे होईल.

**शं. वा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.

●●●

(पान क्र. ५ वरून)

**प्रश्न पाण्याचा - जीवन मरणाचा**

केले नाहीत तर आपल्या सुजलाम प्रदेशाचे वाळवंटात रुपांतर होण्यास वेळ लागणार नाही.

ते तसे व्हायच्या आधीच कार्यरत व्हायची सद्बुद्धी परमेश्वराने आम्हाला द्यावी ही एकमेव प्रार्थना.

**पूनम सिंगवी**

●●●

# वृद्धत्वाचे प्रश्न

*आयुष्यभर धावपळ करीत असताना माणसाला अचानकच वृद्धत्वाला सामोरे जावे लागते. 'एकाकी' पडण्याचे, तुटकेपणाचे भोग भोगत व असहायपणे वाट पहात राहवयी अशा मावळत्या वयाबद्दलचे प्रकट चिंतन- संपादक*

भारतात एकत्र कुटुबपद्धती जोपर्यंत अस्तित्वात होती तोपर्यंत मोठ्या कुटुंबात एक दोनच काय पण अधिकही वृद्ध माणसांना सहज सामावून घेतले जात असे. तेथे त्यांच्या जेवणाची, राहण्याची, औषधपाण्याची तसेच भावनिक आणि मानसिक गुंफणीची सहजसुलभ व्यवस्था होत असे आणि त्यावेळी वडीलधाऱ्यांच्या मनामध्ये उपकृततेचा किंवा ओशाळगताचा विचारही येत नसे. कुटुंबात त्यांना एक हक्कपूर्ण मानाचे स्थान असे. वृद्धांचे दिवस नातवंडांच्या सहवासात कसे फुलपाखरांप्रमाणे भुर्रकन जात. नातवंडे आणि आजी बाच्यामधील भावबंध एका प्रसिद्ध कवयित्रीच्या खाली काही पंक्तीतून सार्थपणे व्यक्त होत आहेत :-

'न्हाऊ माखू घालताना विसरले मी माझ्या मना,
दूर पळाल्या पळभर व्यथा, वेदना
त्या हसऱ्या गाली रिमझिम गाणी
आजीच्या डोळा कौतुक पाणी.
तुझ्या रुपे गवसला हाती तिच्या चिंतामणी'

पण आज वाटते की कोठे हरवली ती आजी ? तिचे डोळियाचे कौतुकपाणी? आणि तो चिंतामणी ? आणि उरली फक्त 'चिंता मनी !' आणि ही चिंता कसली ? तर नातवंडाचे प्रेम दूरच पण आपण संसाराचे आधारस्तंभ ठरत आहोत की आपल्याकडे संपूर्ण दुर्लक्ष करावी अशी अडगळ?

दुसऱ्या महायुद्धानंतर आपल्याकडे सामाजिक, कौटुंबिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिस्थितीत जलद गतीने बदल होत गेले. स्त्रिया पूर्वीपेक्षा अधिक अर्थार्जन करू लागल्या. तरुणपिढीस आपल्या आवडीस मुरड घालणे, वेळप्रसंगी तडजोड साधणे अवघड आणि अशक्यही होऊ लागले, घरातील रोजच्या व्यवहारात, कपडेलत्त्यात, बोलण्याचालण्यात, आहार विहारात दोन पिढ्यांमध्ये मोठे अंतर पडू लागले. तरुणांच्या आखीवरेखीव तसेच चंगळवादामुळे जीवनात त्यांना वृद्ध नको होतात, अडगळ ठरतात. वृद्धांचा सहवास नकोसा वाटू लागतो. दुसऱ्या बाजूस वृद्धांच्या आयुर्मानात आणि त्याचबरोबर मानापानाच्या गंडांतही वाढ होऊ लागली ते काही वेळा शारीरिक दुर्बलतेचे भांडवल करून इतरांवर भावनिक दवाव आणतात. तरुणांच्या आनंदावर विरजणही घातले जाते. स्वातंत्र्योत्तर तर पैशास सार्वभौम स्थान लाभले आणि मग पैशाच्या तुलनेत माया, आपुलकी, सहानुभूती, त्याग वगैरे मूल्ये ऱ्हास पावू लागली. एकत्र कुटुंब पद्धतीच्या मध्यम वर्गीय संस्कृतीचा कणाच जणू खिळखिळा झाला ! या साऱ्याचे समाजरचनेवर होणारे बदल अटळ असतात. ते कसल्याही संमतीची वाट पहात नाहीत की कुठल्याही विरोधाची पर्वाही करीत नाहीत. ते बदल सामंजस्याने स्वीकारणे आणि त्याच्याशी सुसंगत व्यवस्था निर्माण करणे हेच अशा वेळी शहाणपणाचे ठरते.

खेड्यामध्ये हा प्रश्न अजूनही तितकासा तीव्रतेने जाणवत नाही याचे कारण तेथे वृद्ध दुर्लक्षित न राहता 'म्हातारा म्हातारी' म्हणून प्रेमाने, मायेने व सन्मानाने त्यांची काळजी वाहिली जाते. कारण तेथे काही प्रमाणात तरी आपली परंपरा व कर्तव्यभावना यांचा बळकट आधार

उपयोगी पडतो.

शहरात मात्र तंत्रज्ञान-विज्ञान आणि प्रसारमाध्यमे यांच्या प्रगतीच्या वेगाबरोबर जग असे जवळ येत चालले आहे की पाश्चात्य संस्कृतीचे वारे येथील कुटुंबव्यवस्थेत जलदगतीने उंबरठ्याच्या आत येऊन पोचले आहेत. जागेच्या व अन्य अडचणीमुळे कुटुंब आटोपशीर असणे आवश्यक बनले आहे. वाढत्या महागाईत पती-पत्नी दोघांनाही नोकरी वा धंदा करणे क्रमप्राप्त झाले आहे. वेगवान कुटुंबात आजी-आजोबांना स्थान प्राप्त होणे कठीणच. नाईलाजच झाला तर 'शिवावर घेतले म्हणून अंगावर घेतले' या दृष्टीने व वृत्तीने तरुण व वृद्ध दोघांचीही कुचंबणा होत काही काळ निभावून नेला जातो. पण मायेच्या वंगणाविना करकर आणि घरघर सुरू होते. वाढत जाते. बघता बघता वृद्ध घरात एक अडगळ वाटू लागतात आणि एक दिवस वृद्धाश्रमात ही अडगळ टाकली (अक्षरश:) जाते. भलेभलेही बऱ्याच वेळा यातून सुटत नाहीत.

वार्धक्याचे सर्वात मोठे दुखणे म्हणजे एकाकी पडणे. असे 'तुटलेपण' त्यांना फार छळत असते. अडगळ ठरल्यावर नेमके हे जिणे त्यांच्या वाट्यास येते. साधारणपणे निवृत्तीपासूनच अर्थार्जन बंद झाले की शहरातील वयस्कांना हळूहळू का होईना पण आपली गरज मुलगा सून यांच्या संसारात कमी कमी होत असल्याचे जाणवू लागते. वयाच्या पन्नाशीच्या आसपास स्वेच्छानिवृत्ती घेणाऱ्यांना तर फारच आधीपासून अशा परिस्थितीला तोंड द्यावे लागते. वेळीच योजना केली तर आपण निरुपयोगी वा उपद्रवी ठरणार नाही. या दृष्टीने भविष्यातील अतिबिकट वेळ टाळणे बऱ्याचदा शक्य असते. यातूनच आपल्या कुटुंबियांना आपण अडगळ न ठरता आधार कसा बनू शकतो याचे मार्ग सुचत जातात. ते जितक्या निग्रहाने व प्रेमरज्जूनी गुंफण करीत वृद्धांच्या आचार विचारात उतरता तेवढ्या प्रमाणात दुधात साखर विरघळावी अशा गोडीचा एकमेकांना 'सहवास-स्वाद' लाभू शकतो.

आपली वडीलमाणसे जशी आहेत तसेच त्यांना सांभाळून घेणे, थोडे मनमोकळे बोलणे, थोडा कानाडोळा करणे हे अधिक शहाणपणाचे ठरते. वृद्धांनीही अधिकार गाजवण्यापेक्षा नमते घ्यावयास हवे. वृद्धांनी मुलांना मोठे केले या अधिकाराने स्वत:च्या अपेक्षा लक्षात घेण्याऐवजी तरुणपिढीच्या लक्षात घेतल्या आणि तरुणांनी आपल्या आई-वडिलांच्या अपेक्षा जाणल्या तरच अपेक्षाभंगाऐवजी सुखाचे सहजीवन शक्य होईल. गतीमान काळाबरोबर व स्पर्धेत टिकण्यासाठी तरुण पिढीपुढेही एक आव्हान आहे हे आजच्या आजी-आजोबांनी ओळखून वागले तर तीही तरुणपिढीस व नातवंडांस हवी आहेत. दोन्ही पिढीमध्ये वादविवाद वा विसंवाद नको, सुसंवाद घडावयास हवा. वृद्धांना कमलपत्राप्रमाणे पाण्यात राहून न भिजण्याची आणि तरीही सदा टवटवीत राहण्याची वानप्रस्थवृत्ती मनात बाणावयास हवी. आजी-आजोबांना वाटते जवळ मुलगा सून असावीत. डोळ्यांसमोर नातवंडे वाढावीत व घरच्या सावलीत प्रेमाचे प्रतिष्ठेने दोन घास मिळावेत. तीन पिढ्या सुखाने नांदणारे 'महाकुटुंब' व त्यातील आजी आजोबा 'महापालक' असे हसरे व एकसंघ घरकुल बनावे ही अपेक्षा दोन्ही बाजूकडून असते.

पण असे इतके सारे माहीत असूनही कोठे काहीतरी बिनसते. कळत न कळत मिठाचा खडा पडतो आणि मग आजी आजोबा घराला आधार ठरण्याऐवजी अडगळ ठरतात आणि ही अडगळ वाढत्या तणावाबरोबर घरात ठेवणेही जड जाते आणि घराबाहेरची वाट त्यांना धरावी लागते. हे असे न घडावे असे वाटत असेल तर प्रत्येक 'भावी' आजीआजोबांनी आपल्या वयाच्या चाळीशी पन्नाशीपासूनच आपली आर्थिक बाजू काटकसरीने व व्यसनाधीन न होता निवृत्तीनंतर किमान स्वत:साठी डोक्यावर छप्पर (ब्लॉक) आणि आपला दैनंदिन खर्च व औषधपाणी भागेल इतकी रक्कम व्याजातून भागेल एवढ्या मुदतठेवी दोघांच्या जोडनावावर आयुष्याच्या अखेरपर्यंत

सांभाळून ठेवावयास हव्यात. शेवटी आर्थिक स्वावलंबनच वृद्धांना, वेळ पडल्यास, दोघानी स्वतंत्र राहण्याची शक्ती देते. वृद्धापकाळ स्वावलंबनाने जगण्याची मानसिक घडणही जमवणे आवश्यक आहे. भावनेच्या आहारी जाऊन समोरचे ताट काय पण बसण्याचा पाटही दिला तर अक्षरश: कुत्राही विचारत नाही. आता तर ताटातीलही कोणता पदार्थ कोणत्या वेळी द्यावयाचा याचेही 'टाईमिंग' जमवावे लागते. आर्थिक स्वावलंबन असलेल्या वृद्धांना (आणि त्यातही देण्यासारखी थोडी पुंजी असलेल्यांना) घराचा बाहेरचा दरवाजा क्वचितच दाखविला जातो. याउलट आर्थिक परावलंबन असलेल्यांना उठसूठ बाहेरचा दरवाजा दाखविला जातो. आपल्या विषयी आधाराऐवजी अडगळीची भावना तरुणांमध्ये निर्माण करण्यास वृद्धच काहीवेळा कारणीभूत ठरतात!



## 'नातीं सोबत एक आजोबा'

याचा अर्थ मुलासुनांच्या संसारात राहूच नये असे नव्हे. सर्वांनी एकत्र राहण्याइतके या जगात वृद्धांसाठी दुसरे काहीही सुखाचे नाही. पण असा लाभलेला हा आपल्या जीवनातील 'बोनस काळ' मानावा. पण असा काही वर्षांचा अल्पकाळाचा बोनस. पण नंतर कडवटपणा घेण्यापेक्षा, वेळीच दूर राहून मुलांच्या संसारात अधून मधून येणे जाणे - राहणे ठेवून दीर्घकालीन संबंध सुखाची ठेवणारी एक प्रकारे 'लाईफ टाईम पेन्शन (!)' मानसिक आरोग्याच्या दृष्टीने व्यवहार्य आणि सुखाची ठरते. पण हा जरी काही जणांना पलायनवाद वाटत असेल आणि मुलगा-सून-नातवंडे यांच्या सहवासातील बोनस काळ आयुष्यभर (किमान जास्तीत जास्त) लाभावा अशी मनापासून तीव्र इच्छा असेल तर त्यांनी सहजीवनात काही खालील पथ्ये पाळणे योग्य ठरेल. त्यामुळेच ते तरुणांच्या संसारात अडगळ न ठरता एक प्रकारे प्रेमाचे खंबीर आधार ठरतील.

१) तरुणांशी वागताना जरुर तेव्हा अलिप्तपणा, आवश्यक तेवढा सहभाग आणि ढवळाढवळ कधीच नाही असे वागावे.

२) मुलासुनांनी आपले ऐकलेच पाहिजे, हा दुराग्रह सोडावा. उलट कुटुंब प्रमुखाची जबाबदारी मुलाच्या खांद्यावर खुशीने सोपवावी.

३) मागितला तरच सल्ला व तोही मानलाच पाहिजे असा आग्रह नसावा.

४) मुलांच्या संसारात बिले भरणे, दूध आणणे, नातवंडांना सांभाळणे इत्यादी कामे सातत्याने आणि प्रसन्न मुद्रेने करून आपली उपयुक्तता टिकवावी. नुसत्याच स्वत:च्या गरजा आत्मकेंद्रितपणे भागवत सर्वांना राबवणारी व्यक्ती नावडती होते.

५) उभयपक्षांनी थोडे सामंजस्याने, समजून घेऊन तडजोडीने आयुष्य जगायचे ठरविले तर दोन्ही नव्हे तर तिन्ही पिढ्यांना एकत्र सुखसमाधानाने राहता येईल.

६) म्हातारपण अटळ असले तरी त्याचे रुपांतर म्हातारचळात म्हणजेच जाणूनबुजून बुद्धीच्या विकृतीत होता कामा नये.

७) वृद्धांनी शारीरिक दुर्बलतेचे वृथा भांडवल करून भावनिक दबाव आणू नये तसेच तरुणांच्या आनंदावर विरजण घालू नये.

८) वृद्धांनी लक्षात घ्यावे की निवृत्ती म्हणजे मनाची निर्लेप व निरामय स्थिती. 'मी-माझे' मधून बाहेर पडणे. काही खटकत असेल तर त्याकडे कानाडोळा करणे. आपला सहवास सर्वांना हवा - हवासा वाटेल, तसेच आपला वियोग चटका लावून जाईल असे आचरण हवे.

हे सारेच सर्वांना सर्वकाळ जमेल असे नाही. आपली अडगळ वाटण्याची व अपमानाची वेळ येण्यापूर्वी चाणाक्षपणे दूर होणे शहाणपणाचे होय. एकत्र कुटुंब पद्धतीचा अट्टाहास धरण्याऐवजी दूर राहूनही 'एकत्र कुटुंब भावना' सांभाळणे अशावेळी महत्त्वाचे. तरुण आणि वृद्धांनी शक्यतर एका घरात, ती अपुरी अथवा गैरसोयीची वाटेल तर वेगवेगळ्या जागी पण मानसिक गुंफण संभाळून राहावयास हवे. सून मुलांच्या संसारात काही काळ उचलून गेले व त्यांना गरज असेपर्यंत आपले वास्तव्य आणि अस्तित्व शाबूत ठेवले तर अगतिकपणा वा अडगळ ठरण्याचा प्रसंग टाळून त्याचे रुपांतर आधार देण्यामागे घडू शकते. तरुणपिढीसही स्वातंत्र्य मिळते, विरंगुळा वा गरज म्हणून हक्काचे घर राहते. आजी-आजोबांना वरचेवर वेगळे कौतुक करण्याची संधी मिळून त्यांचे महत्त्व वाढते. 'येणार येणार' म्हणून वाट पहाण्यातही वेगळा आनंद उपभोगता येतो.

आजी-आजोबा बऱ्याच अंशी घरातच पण थोडेफार 'घरापासून दूर' राहावेत आणि तरीही त्याची झळ दोन पिढ्यांस लागू नये असे घडू शकले तर किती बरे होईल! आधाराच्या वेळी पुढे आणि अडगळ वाटण्यापूर्वी त्या त्या वेळी दूर असे येईल का जमवता ? कसे हे घडवावयाचे ? यासाठी सिंगापूरच्या समाजधुरिणांनी एक योजना अंमलात आणली आहे. त्यांच्या सरकारनेही त्यास मान्यता दिली. बिल्डर्स आणि आर्किटेक्ट यांनी मुलांकरिता त्यांच्या आवडीप्रमाणे एक किंवा दोन बेडरूम फ्लॅट व आईवडिलांसाठी एक बेडरूम फ्लॅट अशा तऱ्हेने बांधलेत की दोन स्वतंत्र फ्लॅटमधील संपर्क साधला जातो तो मध्ये ठेवलेल्या एका दरवाजाने. आवश्यक तेव्हा उघडला आणि स्वातंत्र्य देणे वा घेणे असेल त्यावेळी बंद केला ! वेळी अवेळी शाळा सुटल्यावर आणि आईवडिल नोकरीवर तर नातवंडे बेबीसीटरऐवजी आजी आजोबांच्या मांडीवर. अचानक आजी-आजोबांना आजारपण वा काही अडचण आली तर मुलांची मदत अगदी हाकेवरच. अशाप्रकारे परस्परांच्या कितीतरी सोयी. दोन्ही पिढ्या स्वतंत्र म्हणून वादाचे प्रसंग कमी. शिवाय महत्त्वाचे म्हणजे एकमेकांना आधार आहे पण अडचण (आणि म्हणून अडगळही !) नाही, अशी नुसती भावना व विश्वास सुद्धा बऱ्याच (आणि वास्तवही !) संकटांची भीती मनातून घालवते. ज्यांनी पन्नाशीपासून वर सांगितल्याप्रमाणे आपले सर्वसाधारण आर्थिक स्वावलंबन साधले आहे त्या आजीआजोबांना आणि सुलभ कर्जाच्या सोयींमुळे तरुणांनाही ही योजना प्रत्यक्षात आणणे आपल्याकडेही जड जाऊ नये.

आणि मग या लेखाच्या सुरुवातीस वर्णन केलेला आजीचा चिंतामणी कधी तिच्या कुशीत, कधी तिच्या समोरच उघड्या मधील दारापलीकडे पण नजरेच्या टप्प्यात तिला सुखवीत राहील, बाळसे धरेल आणि मोठा होईल. आणि मग आजी-नातू दोघांच्याही (त्याच बरोबर इतरांच्याही !) हसऱ्या गालावरील रिमझिम गाणी 'अवघे विश्व साकारले या डोळा' असे कौतुकमय होऊन उजळून निघेल. मनीच्या चिंता कधीही परत न येण्यासाठी कोसो मैल दूर दूर कायमच्या पळवून लावीत - आपण अडगळ नाही, आधार ठरणार आहोत या जाणिवेने !

वसंत श्री. देशपांडे
६, पराग सोसायटी, शिवाजीनगर, नौपाडा,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी - २५४२ २५७३

●●●

# सार्वजनिक वाचनालय कल्याण

*कल्याण येथील सार्वजनिक वाचनालयाने अलीकडेच शतकोत्तर रौप्यमहोत्सव साजरा केला. त्या निमित्ताने त्या ग्रंथलयाबद्दलचा हा लेख- संपादक*

कल्याणची 'सार्वजनिक वाचनालय' ही संस्था सव्वाशे वर्षं एवढी जुनी असून आपला शतकोत्तर रौप्य महोत्सव अलीकडेच साजरा केला. या निमित्ताने गेले वर्षभर अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते वाचन संस्कृतीचे संवर्धन व्हावे यासाठी आयोजित करण्यात आलेल्या लेखक-वाचक संवादास अनेक मान्यवर साहित्यिक सहभागी झाले होते आणि या उपक्रमास कल्याणकरांनी उदंड असा प्रतिसाद दिला.



शतकोत्तर रौप्य महोत्सव साजरे करणारे कल्याणच्या सार्वजनिक वाचनालयाची वास्तू.

या उपक्रमात सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. सौ. वीणा देव, डॉ. अंजली कीर्तने, सुप्रसिद्ध लेखक ह. मो. मराठे, प्रा. राम क्षीरसागर, डॉ. भास्कर गिरिधारी, सुप्रसिद्ध लेखक डॉ. अनिल अवचट, श्रीमती मीना देवल अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. डॉ. सुभाष भेंडे इ. मान्यवर साहित्यिकांचा सहभाग होता.

या शतकोत्तर रौप्य महोत्सवाचा सांगता समारंभ रविवार, दि. १२ जानेवारी २००३ रोजी सकाळी १०.१५ वाजता कल्याणच्या आचार्य अत्रे रंगमंदिरात आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला सुप्रसिद्ध साहित्यिक, संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. यशवंत पाठक उपस्थित होते. विशेष अतिथी म्हणून ठाण्याचे खासदार माननीय श्री. प्रकाश परांजपे, कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या महापौर सौ. मंगला सुनील शिंदे तसेच माजी खासदार व वाचनालयाचे माजी अध्यक्ष प्रा. राम कापसे हे ही उपस्थित होते. या प्रसंगी वाचनालयाच्या माजी अध्यक्षांचा गौरव करण्यात आला.

त्यावेळचे कल्याणचे मामलेदार सीताराम दामोदर ओळेकर, रावबहादूर मोरेश्वर साठे व अन्य गावातील पुढारी मंडळींनी प्रयत्न करून कल्याण सार्वजनिक वाचनालयाची स्थापना ३ फेब्रुवारी १८७८ रोजी केली. प्रारंभी रावबहादूर साठे यांच्या जागेतच हे वाचनालय सुरू करण्यात आले. सुरुवातीला म्युलक जनरल लायब्ररी, नेटीव्ह जनरल लायब्ररी, अशी नावे वाचनालयाला देण्यात आली. स्वराज्याचे वारे वाहू लागल्यावर लोकमान्य टिळकांच्या प्रेरणेने ही नावे बदलून सार्वजनिक वाचनालय, कल्याण असे नामकरण करण्यात आले. पुढे कालांतराने सार्वजनिक वाचनालयाचे कल्याण नगरपालिकेसमोरील डाकबंगले वजा इमारतीत स्थलांतर करण्यात आले.

पंचवीस, पन्नास वर्षांचा टप्पा मागे टाकीत वाचनालयाने सुवर्ण महोत्सवी वर्षात प्रवेश केला. अध्यक्ष नीळकंठ रामचंद्र सबनीस, उपाध्यक्ष डॉ. चिंतामणी बाळकृष्ण वैद्य, कृष्णाजी विष्णु पेठे, कार्यवाह विष्णु लक्ष्मण

फडके, कोषाध्यक्ष लक्ष्मण नारायण भावे, विश्वनाथ नारायण मोडक, विनायक चिंतामणी धारप, रामकृष्ण नारायण करमरकर आदी सभासदांनी सुवर्ण महोत्सव थाटात करण्याचे ठरवून जिद्दीने कामाला सुरुवात केली आणि ३ फेब्रुवारी १९३५ रोजी वाचनालयाच्या सुवर्ण महोत्सव थाटात साजरा करण्यात आला. याप्रसंगी साहित्यसम्राट न.चि. तथा तात्यासाहेब केळकर हे अध्यक्ष म्हणून लाभले होते तर जॉली स्पेशल क्लब कल्याण या संस्थेने मामा वरेरकर यांच्या दोन नाटकांचे प्रयोग करून वाचनालयाला त्या काळात चारशे रुपयांची देणगीही मिळवून दिली होती.

वाचनालयाची पुढील वाटचाल अधिक जोमाने होण्याची अपेक्षा असतानाच पुनश्च एकदा संस्थेच्या नशिबी दुरवस्था आली. १९४० ते १९५० या दशकात वाचनालय अत्यंत खडतर परिस्थितीतून जात असतानाच डॉ. चि.वा.वैद्य, श्री. बि. चि. धारप वकील व श्री. जोग आदींच्या परिश्रमाने वाचनालय पुन: सावरले. धारप वकिलांनी वाचनालयाच्या जागेत दुकानांचे गाळे काढले व केसरी वर्तमानपत्राच्या वितरणाची व्यवस्था वाचनालयाकडे आल्याने वाचनालयाच्या उत्पन्नास हातभार लागला. १९५५ पासून त्यावेळचे कल्याणचे पुढारी श्री. नानासाहेब फडके, डॉ. य.बा. मोकाशी, श्री. बापूराव आधारकर, श्री. आगाशे, श्री. प्र. अ. संत आदी मंडळींची कार्यकारिणीवर निवड झाली आणि वाचनालयाला पुन: बरे दिवस आलेत.

वाचनालयाचा व्याप वाढला. जागेची टंचाई भासू लागली. त्यातूनच वाचनालयाच्या वैळ्या जागेवर मजला बांधण्याची कल्पना पुढे आली आणि अर्थातच त्यास निधीची आवश्यकता होती. निधी उभारून प्रत्यक्ष इमारत करण्यासाठी १२ एप्रिल १९५८ रोजी डॉ. य.बा. मोकाशी, श्री. नानासाहेब फडके, श्री. वा.स.सबनीस, श्री. प्र.अ.संत, श्री. बापूराव आधारकर, डॉ. भा.का. मोडक, श्री. बि. चि. धारप आदी सभासदांची समिती नियुक्त करण्यात आली. या समितीने कर्ज सहाय्य, देणग्या या द्वारा रु. ३५,००० जमा करून जुन्या इमारतींच्या जागी नवीन इमारत २७ डिसेंबर १९५८ रोजी उभी करण्यात आली. या अवधीत वाचनालय शंकरराव चौकातील तरुण गुजराथी मंडळाच्या जागेत हलवून वाचकांची सोय करण्यात आली होती.

स्वत:ची वास्तू तयार झाल्यावर कार्यकर्त्यांना अधिकच बळ मिळाले आणि इंग्रजी-मराठी ज्ञानकोशांचा संग्रह करणे, ग्रंथांचे वर्गीकरण, विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका, अद्ययावत फर्निचर आदी योजना राबवण्याचा निर्धार करण्यात आला. या सर्व कामांकरिता निधीची आवश्यकता होतीच.

१९६८ च्या दीपावलीपासून पुन: निधी संकलनाचे कार्य हातात घेण्यात आले या कामाला नामदार मधुसूदन वैराळे यांच्या हस्ते रोटरी क्लब, कल्याणने रुपये वीस हजारांची देणगी वाचनालयाला दिली. या कार्यक्रमाला रोटरी क्लबचे डिस्ट्रीक गव्हर्नर सोली सोराबजी हजर होते. मा. ना. वैराळे यांच्या हस्ते वास्तूच्या नूतनीकरणाच्या कामास शुभारंभ करण्यात आला.

महाराष्ट्र ग्रंथालय, परिषदेचे सदस्य महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार, प्रा. ग. प्र. प्रधान, शा. शं. रेगे, ग्रंथालय संचालक कृ. द. पुरागिक, सहाय्यक ग्रंथ संचालक कृष्णा मुकुंद उजवळकर यांच्या सक्रिय सहकार्यामुळे महाराष्ट्र शासनाकडून रु. पंचवीस हजाराचे अनुदान वाचनालयास प्राप्त झाले. या सर्व प्रयत्नामुळेच वाचनालयाच्या सभागृहाच्या कामाला गती येऊन ऑक्टोबर १९६९ मध्ये त्यावेळचे मुंबईचे शेरीफ श्री अण्णासाहेब डहाणूकर यांच्या हस्ते वाचनालयाच्या नवीन सभागृहाचे उद्घाटन झाले आणि कार्यकर्त्यांच्या मनातील कल्पना मूर्त स्वरुपात साकार झाली.

या वेळ पावेतो वाचनालयाने सत्तर वर्षे पूर्ण केलेली

होती. मुक्तद्वार वाचनालय असावे. या शासकीय धोरणाची अमलबजावणी करण्यासाठी कार्यकर्त्यांनी प्रयत्न सुरू केले. यामध्ये श्री. वि. चिं. धारप यांचा महत्त्वाचा वाटा होता. त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन १ एप्रिल १९५१ ला शासनाची मुक्तद्वार वाचनालयाला मान्यता मिळून मुक्तद्वार विभाग सुरू झाला. प्रारंभी नोकरदार पेशातील वाचकांच्या सोयीसाठी वाचनालय सायंकाळीच उघडले जात असे. वाचकांच्या मागणीवरून १ मार्च १९५६ पासून वाचनालय सकाळीही उघडे ठेवण्यात येऊन लागले.

महाराष्ट्र सरकारचा ग्रंथालय कायदा १९६८ मध्ये अमलात आला. त्यानुसार ठाणे जिल्ह्यातील आपल्या जुन्या वाचनालयाला 'ब' वर्ग प्रदान करण्यात आला. अर्थात शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानात वाढ झाल्यामुळे अधिकाधिक ग्रंथ खरेदी करणे वाचनालयाला शक्य झाले.

१२ मार्च १९७८ रोजी वाचनालयाने आपला शताब्दी महोत्सव साजरा केला. या शताब्दी महोत्सवाचे उद्घाटन कवीवर्य कुसुमाग्रज यांच्या हस्ते झाले. लोकशाही आणि वृत्तपत्रे या चर्चासत्रात त्या वेळचे सकाळचे संपादक श्री. ग. मुणगेकर हे अध्यक्ष होते. या शताब्दी महोत्सवात चंद्रलेखा या नाट्य संस्थेने 'गुलमोहर' या नाटकाचा प्रयोग सादर केला होता. १२ मार्च १९७८ रोजी या कार्यक्रमात 'आम्ही पुणेकर' या कार्यक्रमात साहित्यिक दि. बा. मोकाशी, श्री. ज. जोशी, श्री. वि. ग. कानिटकर, सौ. ज्योत्स्ना देवधर, प्रा. अनंत भावे आदी सहभागी झाले होते.

वाचनालयाला अनेक नामवंत साहित्यिकांनीही भेटी दिलेल्या आहेत त्यात महाराष्ट्राची दोन दैवतं - कविवर्य कुसुमाग्रज आणि पु. ल. देशपांडे यांचाही समावेश आहे.

कल्याण शहराचा वाढता विस्तार लक्षात घेऊन वाचनालयाने रामबाग, मुरबाड रोड आदी भागात आपल्या शाखा सुरू करून वाचकांची मोठीच सोय केली. बालवयात वाचनाची आवड निर्माण व्हावी, वृद्धींगत व्हावी यासाठी १ मे १९७७ पासून वाचनालयाने स्वतंत्र बालविभाग सुरू केला. मराठी वाचकांमधील दिवाळी अंकाविषयींचे प्रेम आणि प्रतिसाद पाहता वाचनालयाने खास दिवाळी अंक विभाग सुरू केला. आजही या योजनेला वाचकांचा प्रतिसाद अपूर्व असा असतो. यावर्षी सहाशेच्या वर दिवाळी अंकाचा लाभ साडेचारशे सभासदांनी घेतला.

वाचनालयाच्या पहिल्या मजल्यावर संदर्भ ग्रंथालय सुरू करण्यात आले. मुक्तद्वार वाचनालयही पहिल्या मजल्यावरच असून अनेक दैनिके, साप्ताहिके, मासिके वाचकांना निःशुल्क उपलब्ध असतात.

१४३ ग्रंथांनी सुरू झालेल्या सार्वजनिक वाचनालयात आज १४ हजार कादंबऱ्या, ८ हजार लघुकथा, ७३०० नाटके, ९१० काव्य, २१५० साहित्य टीकल, ४३६८ चरित्रे, ६७६ ऐतिहासिक पुस्तके, ३४५० धार्मिक पुस्तके, १९०० राजकीय ग्रंथ, ६३० प्रवास वर्णने, १४०० शास्त्रीय तसेच विज्ञान विषयक ग्रंथ, ६०० च्या वर दुर्मिळ संदर्भ ग्रंथ, ३६०० इंग्रजी ग्रंथ याशिवाय क्रीडा-कला, ज्योतिष, आरोग्य, पाककला, श्रमिक-उद्योग आदी विषयांवर मिळून ५३००० वर ग्रंथ संग्रह आहे.

शतकोत्तर सुवर्ण महोत्सवाकडे वाटचाल करताना वाचनालयापुढे जशा अनेक योजना आहेत तशीच अनेक आव्हानेही. सध्या वाचनालयाकडे दुमजली इमारत असली तरी ती आज सर्वस्वी अपुरी आहे. वाचनालयाची संदर्भ वाचनालय कल्पना साकार होण्यासाठी वाचनालयास प्रशस्त अशा जागेची आवश्यकता आहे. अशा प्रशस्त जागेमुळे अभ्यासक, संशोधकाची फारच मोठी सोय कल्याणात होणार आहे. कल्याण आज अनेक अंगांनी वाढलेले एक महत्त्वाचे महानगर गणले जाऊ लागलंय. वाचकांची सोय व्हावी तसेच वाचन संस्कार दृढ करण्यासाठी

(पान नं. ३३ वर)

# ग्रंथ विश्व

*ग्रंथप्रसार हे व्रत आयुष्यभर जोपासणारे श्री. शरद जोशी यांनी दिशासाठी पाठविलेले साहित्य वाचकांना निश्चित वाचनीय व माहिती पूर्ण वाटेल. - संपादक*

## 'न्यायधर्म' - कायदेविषयक नवे मासिक

कायदा या विषयाला वाहिलेले 'न्यायधर्म' हे मासिक (सं. उज्ज्वला जोशी, फ्लॅट आर.एल. - १२, एम् आय.डी.सी., वाळुंज, कोलगेट फॅक्टरीसमोर, बजाज नगर, औरंगाबाद) प्रजासत्ताक दिनापासून सुरू झालेले आहे. त्यात कायदेविषयक प्रश्नांना मोफत उत्तरे देण्यात येतील. याशिवाय न्यायालयांच्या निवडक निकालांचा सारांश मराठीतून देण्यात येईल.

## 'दिलीपराज प्रकाशना'ला सर्वोच्च मानाचा राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त.

'दिलीपराज प्रकाशना'स (संचालक - राजीव बर्वे, २५१ क, शनिवार पेठ, मुटेश्वर चौक, पुणे - ४११ ०३०) सर्वोच्च मानाचा राष्ट्रपती पुरस्कार मिळाला आहे. 'मौलिक मराठी चित्रगीते' या कवी गंगाधर महांबरे (शिवरंजनी १२, कलानगर, पुणे-सातारा रस्ता, पुणे - ४११०४३) यांच्या पुस्तकास हा पुरस्कार मिळाला. गंगाधर महांबरे व राजीव बर्वे या दोघांना हा पुरस्कार भारताचे आदरणीय राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांच्या हस्ते दि. १३.२.२००३ रोजी दिल्लीच्या विज्ञान भवन येथे झालेल्या समारंभात देण्यात आला. रु. १५,०००/- रोख प्रशस्तीपत्रक आणि सुवर्णकमळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. गेल्या ३२ वर्षांच्या वाटचालीत दिलीपराज प्रकाशनने ११०० पुस्तके प्रसिद्ध केलेली आहे.

या प्रकाशनाच्या यशस्वी कारकीर्दीतील काही महत्वाचे टप्पे असे -

१) स्थापना - कोजागिरी पौर्णिमा - (१९७१)

२) प्रकाशन क्र. १ 'छान छान नाटकली' सौ. अश्विनी धोंगडे.

३) प्रकाशन क्र. १०० 'पुढी' - प्रा. द. के. बर्वे - (१९८०)

४) प्रकाशन क्र. ५०० दलित आत्मचरित्रे : साहित्य आणि समाज - डॉ. रमेश धोंगडे, (मे १९९२)

५) प्रकाशन क्र. ७५१ 'विश्वसाहित्यातील फेरफटका' - ले. शंकर सारडा (१९९६)

६) प्रकाशन क्र. १००० शतकाची विचार शैली - ले. डॉ. रमेश धोंगडे - (जाने. २००२)

या हजाराव्या प्रकाशनानिमित्त ११ व १२ जाने. २००२ रोजी पुण्यात सहस्त्रावर्तन समारंभ मोठ्या थाटात साजरा झाला. महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांतील अनेक नामवंत मंडळी (लेखक, साहित्यिक - कवी - प्रकाशक इ.) उपस्थित होती. त्यानिमित्त संस्थेने 'सहस्त्रावर्तन' ही एक सुबक व संग्राह्य स्मरणिका प्रसिद्ध केली होती. त्यामध्ये सर्वश्री बाबा कदम, शंकर सारडा, अनिल बळेल, सुहास शिरवळकर, राजवी बर्वे / सौ. मधूमिता बर्वे इ. अनेक नामवंतांचे लेख आहेत.

## शोभा भागवत यांचे संग्राह्य पुस्तक 'आपली मुलं'

शोभा भागवत (५०५, शनिवार पेठ, पुणे - ४११०३०) यांचे 'आपली मुलं' हे एक उत्कृष्ट पुस्तक

आहे. (प्रका. राजहंस प्रकाशन, १०२५, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३०). १५ मे १९८४ रोजी त्याची पहिली आवृत्ती प्रसिद्ध झाली होती तर एप्रिल २००१ मध्ये त्याची नववी आवृत्ती प्रसिद्ध झाली होती. (या दोन वर्षांत आणखीनही एक दोन आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या असाव्यात! या नवव्या आवृत्तीची पृष्ठे आहेत १०० व मूल्य आहे अवघे रु. ४५/-)

मूल व्हायचीच आणि ती आपोआप वाढायचीच अशा समजुतीचा काळ आता मागे पडला आहे. पालकांचं काम दिवसेंदिवस अधिकाधिक कौशल्याची मागणी करणारं असतं. मुलांना चांगल्या वाईटाचा विवेक शिकवणं, आत्मविश्वास देणं, निर्णयक्षमता देणं हे आपलं काम आहे. मुलांचं निरीक्षण करणं, त्यांच्याशी संवाद साधणं, आपल्या मनातलं मोकळेपणानं सांगणं, त्यांच्या मनातलं समजून घेणं, काही विसरणं, काही आठवणीनं उल्लेख करणं, वरचसं देणं आणि ग्रेसफुली घेणं अशी कितीतरी कौशल्य आपल्याला यायला हवीत. त्या दृष्टीने यातील 'आपण मुलांशी बोलायला शिकू या.', 'आनंदाचे अनुभव', 'आपलं मुल आहे तरी कसं?' 'आपण पालक म्हणून कसे आहोत?', 'कुठे मिळेल पालकत्वाचं शिक्षण?', 'मुलं आपल्याला घडवतात.' 'ही पण आपलीच मुलं', 'काही वेगळी मुलं', 'समाज पालकत्व मागत असतो', 'अभ्यास मुलांचा आणि आपला', 'कशासाठी? मुलांसाठी?', 'गप्पांना निमित्त' या प्रकरणाची योजना केलेली आहे. प्रत्येक पालकानं वाचलच पाहिजे, असं हे सुंदर पुस्तक आहे. १९८५-८६ या वर्षाचा राज्य पुरस्कार या पुस्तकास लाभलेला आहे. लेखिका शोभा भागवत व प्रकाशक दिलीप माजगावकर यांचे अभिनंदन.

## डॉ. अरुण मांडे लिखित 'संगोपन तान्हुल्याचे' पुस्तक संग्राह्य

डॉ. अरुण मांडे (कार्तिक सोसायटी, प्रोफेसर कॉलनी, चैतन्य नगर, सावेडी रोड, अहमदनगर - ४१४००३) यांचे हे वाचनीय व संग्राह्य पुस्तक (सप्टें १९९८ रोजी निघालेल्या द्वितीय आवृत्तीची पृष्ठे आहेत १४४ व मूल्य आहे रु. ६५/-). प्रथम आवृत्ती मार्च १९९८ मध्ये निघाली होती. गेल्या ४-५ वर्षांत आणखी एखादी आवृत्ती प्रसिद्ध झालेली असावी ! या पुस्तकाचे प्रकाशक आहेत प्रदीप चंपानेरकर, रोहन प्रकाशन, ३९६ ब, नारायण पेठ, १ ला मजला, पत्र्या मारुती चौक, पुणे - ४११०३. फोन नं. ४४८०६८६. मुंबई कार्यालयाचा पत्ता - दुकान नं. १, ब, स्वामी समर्थनगर, काऊ लेन, गुगभाट, गिरगाव, मुंबई - ४०० ००४. दूरध्वनी - ९५२२-४४८०६८६. संस्थेचे हे एकशे एकावे प्रकाशन असून आतापर्यंत संस्थेने सुमारे १६० पुस्तके प्रकाशित केलेली आहेत.

### संगोपन तान्हुल्याचे

आपल्या तान्हुल्याची निरोगी वाढ कशी होईल, हीच एक काळजी प्रत्येक सुजाण मातेच्या मनाचा कोपरा न कोपरा व्यापून राहिलेली असते. जगभरातल्या बाल-संगोपन तज्ज्ञांनी बाळाची पहिल्या वर्षातल्या प्रत्येक महिन्यात कसकशी वाढ होत जाते, याची काही निश्चित निदान केलेली आहेत. त्यांनी संशोधिलेल्या आराखड्याप्रमाणे आपल्या बाळाची वाढ कशी राखावी, कोणत्या दक्षता घ्याव्यात, कोणत्या गोष्टी टाळाव्यात इ. बाबत सोपी शास्त्रीय माहिती सोप्या साध्या, सरळ भाषेत या पुस्तकातील २४ प्रकरणांतून दिलेली आहे. माता-पित्यांच्या मनातल्या अनेक शंका हे पुस्तक वाचून दूर होणाऱ्या आहेत. प्रस्तावनाकार डॉ. प्रमोद जोग यांनी म्हटल्याप्रमाणे तान्हुल्याचं संगोपन ही एक मोठी जबाबदारी असते; परंतु त्याच्या मागचं शास्त्र समजून घेऊन त्यात रस

घेतला की, दिवसाचा थकवा पार गळून जातो अन् पाहता पाहता मुलं मोठी होतात, हे खरं आहे. पुस्तक संग्राह्य आहे.

### प्रेरणादायी पुस्तके

### जोहड (चरित्रात्मक कादंबरी

ले. सौ. सुरेखा शहा (चंद्ररेखा, प्रभाकर मार्ग, सम्राट चौक, सोलापूर - ४१३००२). मॅगसेसे ॲवार्ड विजेते डॉ. राजेंद्रसिंह (जयपूर) यांच्या भगीरथ प्रयत्नांनी राजस्थानमधील वाळवंटी प्रदेशातील अनेक गावे तेथील गावकऱ्यांच्या सहकार्याने सुजलाम् सुफलाम् करून सोडली. चौपट पिके घेऊन दाखविली. राजस्थानातील मृतप्राय भूमीला, तेथील माणसांच्या मेलेल्या मनाला राजेंद्रसिंहानी संजीवन दिले. तेथील अंध:कारमय जीवन उजळून निघाले. जगात इतरत्र असे उदाहरण दुर्मिळ आहे. अशा या कर्तृत्वाच्या कहाण्या. या कादंबरीचे नाव आहे 'जोहड'. प्रकाशक आहेत. श्री श्रेणिक अन्नदाते, सुमेरु प्रकाशन, डी - ६, राजहंस सोसायटी, टिळकनगर, डोंबिवली (पू.) - ४२१२०१ (दूरध्वनी - ९५२५१-४०४१४९/४३५९६८) पृ. २४० मूल्य रु. २६०/- प्रत्येकाने वाचावेच असे हे प्रेरणादायी पुस्तक आहे.

### चाकाची खुर्ची - आत्मकथन

ले. नसीमा हुरजूक (हेल्पर्स ऑफ दि हॅण्डिकॅप्ड, नशेमन, २३५/११, ई वॉर्ड, ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६००३. पृ. २२० मूल्य रु. १८०/- प्रकाशक मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३०. दूरध्वनी - २४४७६९२४. गेली ३४ वर्षे खुर्चीला खिळून असलेल्या (जागतिक कीर्तीचे विज्ञानशास्त्रज्ञ स्टीफन हॉकिंग यांच्याप्रमाणे) नसीमा हुरजूक या अपंग महिलेची अविस्मरणीय कहाणी. रोज मरणांतिक यातना सोसूनही तिची जीवननिष्ठा श्रेष्ठ दर्जाची आहे. शेकडो अपंगांच्या जीवनात तिने स्थैर्य निर्माण केले आहे. कोल्हापूरच्या 'दै. सकाळ'मध्ये १२-१३ वर्षांपूर्वी तिने आपले अनुभव शब्दबद्ध केले. त्याचेच हे वाचनीय/संग्राह्य पुस्तक. तिच्या धाडसाचे, जिद्दीचे समाजसेवा वृत्तीचे कौतुक करावे तेवढे थोडेच. हे पुस्तकही प्रेरणादायी आहे.

### श्री रामरक्षेतील व्याकरण

ले. दिनकर दामोदर औटी, कर्जत. श्रीरामरक्षा हे स्तोत्र महाराष्ट्रातील घराघरातून म्हटले जाते. त्यावर काही तुरळक लेख वगळता संपूर्ण माहिती देणारे असे पुस्तक नव्हते. ती उणीव या पुस्तकाने भरून निघाली आहे. त्यात स्तोत्र, अन्वय अर्थ, समास, विग्रह इ. व्याकरणविषयक सर्व माहिती आहे. पुस्तकाची किंमत आहे रु. ५०/- प्रकाशक आहेत - सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट, द्वारा लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमा समोर, कोलबाड, ठाणे - ४०० ६०१ दूरध्वनी - २५४७१४९८.

शरद जोशी(ग्रंथप्रसारक)
सी/५, अमर कल्पतरु को. सो., देवी चौक,
शास्त्रीनगर, डोंबिवली (प.),
जि. ठाणे - ४२१२०२

●●●

दिशा
नियमित वाचा

आपली मते जाणून घेण्यास
आम्ही उत्सुक आहोत.

# पुस्तक परिचय - 'श्रीरामरक्षेतील व्याकरण'

*या महिन्यात 'रामनवमी' येत आहे. त्या निमित्ताने 'रामरक्षेतील व्याकरण' या पुस्तकाचा परिचय देत आहोत.*

*- संपादक*

'यद्यपि बहुनाधीषे तथापि पठ पुत्र व्याकरणम् ॥

'हितोपदेश' मधील एका गोष्टीत पंडीतानी मुलांना हा उपदेश केला आहे. ते म्हणतात, 'मुला, तू पुष्कळ अध्ययन केले नाहीस तरी चालेल पण व्याकरण शीक!' आणि पुढे त्यांनी 'सकृत-शकृत, सकलं-शकलं' अशा अर्थ भिन्नेच्या जोड्या उदाहरण म्हणून सांगितल्या आहेत! आणखी एकच उदाहरण घेऊ. पंडीतानी प्रश्न केला, 'का शीतल वाहिनी गंगा ? उत्तर - काशीतल वाहिनी गंगा.' तसेच कं बलवंतं न बाधते शीतम् ? उत्तर - कंबलवंतं न बाधते शीतम् ॥' यावरुन हे स्पष्ट होते की, शुद्ध कसे बोलावे व शुद्ध कसे लिहावे हे व्याकरण शिकल्याने कळते. भाषेचे सौंदर्य जाणून घेण्यासाठी व्याकरणाची जाण आवश्यक आहे.

आद्य कवी वाल्मिकींनी रामायण महाकाव्याची रचना केली. महाकाव्याची जी व्याख्या केली त्यात शृंगार, करुण आदी नव रस, उपमा उत्प्रेक्षा आदी अलंकार, भाषेची प्रौढता, आदी अनेक लक्षणे सांगितली आहेत. येथे संदर्भ फक्त व्याकरणिक विषयांचाच घेतला आहे. अर्थामागून धावणारी शब्द रचना, शब्दांचा संधी, शब्दांमधील सामासिकता व काव्यातील वाक्य विश्लेषण कळल्याशिवाय त्या काव्याचा आस्वाद पूर्णत्वाने घेता येत नाही. या पार्श्वभूमीवर श्री. दिनकर दामोदर औटी यांनी 'श्री रामरक्षा स्तोत्रातील व्याकरण' या पुस्तकाची रचना अतिशय महत्वाची अशीच आहे.

'राम' या शब्दाची व्युत्पत्ती पाहता एके ठिकाणी त्याचे विवेचन आले ते असे - 'रा' शब्दो विश्ववाचकः, 'मश्चापि ईश्वर वाचकः । विश्वाधीनेश्वरो यस्य स रामः इति प्रकीर्तितः ॥ म्हणजे 'रा' शब्द विश्व वाचक असून 'म' शब्द (अक्षर) ईश्वर वाचक आहे. विश्व ज्याच्या अधीन आहे, तो 'राम' या शब्दानी वर्णिला गेला. 'र' हे अक्षरच मुळी पाप जाळून टाकणारे आहे. पहा - 'रेफः पापस्य दाहकः' असे एक सूत्र आहे.

देवतांची स्तुती करणारी रचना ते स्तवन. स्तवन म्हणजे स्तोत्र. गणपती, सरस्वती, शिव, कृष्ण, विष्णु आदी देवतांची जशी स्तोत्रे आहेत. तसेच 'राम' या देवतेचेही स्तोत्र आहे. ते 'रामरक्षा स्तोत्र' होय. काही स्तोत्रांध्ये कवच आणि कीलक असे दोन भाग असण्याची पद्धती प्रचलित आहे. 'सप्तशती' या देवीच्या स्तवन काव्यात या दोहोंचा अंतर्भाव झाला आहे. रामरक्षा स्तोत्रातही हे आढळते. डॉ. विजय बेडेकर यांनी या पुस्तकाच्या प्रस्तावनेत याचा सार्थ उल्लेख केलेला आहे. तो असा - 'रामरक्षास्तोत्र हे वैदिक आणि तांत्रिक प्रवाहाचे एक सुंदर मिश्रण आहे. हे स्तोत्र 'मंत्र' असल्याचे रामरक्षेच्या सुरवातीलाच सांगितले आहे आणि म्हणूनच मंत्राच्या सुरवातीला मंत्राचा ऋषी (बुधकौशिक) छंद, (अनुष्टुप) देवता, विनियोग, बीज, शक्ती आणि कीलक इ. रामरक्षेच्या पहिल्या श्लोकातच देण्यात आले आहेत.

यावरुन रामरक्षा हे तंत्रात्मक आणि मंत्रात्मक असे स्तोत्र आहे हे स्पष्ट होते. तन म्हणजे शरीर - त्याचे त्राण म्हणजे रक्षण करणे. तसेच मन व त्याचे रक्षण करणारे. असा तंत्र व मंत्र यांचा अर्थ आहे. श्रीमद् भागवद्गीतेत मन हे सहाव्ये इंद्रीय आहे, असा उल्लेख असून 'प्रकृतिः स्थानी

कर्षति' असे स्पष्ट केले आहे. भौतिक बन्धन आणि मोक्ष याचे कारण 'मन' च आहे असेही पुढे म्हटले आहे. श्रीसमर्थ रामदास स्वामींनी तर मनाला 'वण' लावण्यासाठी 'श्रीमनाचे श्लोक' लिहिले. यावरून रामरक्षा स्तोत्राचे महत्त्व ध्यानी येते. देवतांची सहस्रनामे पठणाची पद्धती ही प्रचलित आहे. जसे - 'विष्णु सहस्र नाम', 'रामरक्षा स्तोत्र' हे त्या तोडीचेच आहे असे स्तोत्राच्या शेवटच्या श्लोकात म्हटले आहे. 'राम रामेति, रामेति, रमे रामे मनोरमे ।' सहस्रनाम तुतुल्यं राम नाम वराजते' असा तो उल्लेख आहे.

एखाद्याला रामनामाचा जप करायला सांगितला तर तो एखादी माळ (१०८ वेळा) जेमतेम म्हणेल. कालमापनाच्या पलीकडे रामनाम जपणारा एखादाच 'वाल्मिकी' असतो. पण तेच 'रामरक्षा स्तोत्र' म्हणायला एवढे अवघड जात नाही. पाशवी व अमानवी शक्तीपासून रक्षण व्हावे यासाठी अशा मंत्राचा उपयोग केला जातो. मंत्र शुद्ध स्वरुपात म्हटला जावा, त्याच्या अर्थाचा बोध व्हावा यासाठी तो समजून घेणे अगत्याचे असते. त्यासाठी व्याकरणाचे साह्य घ्यावेच लागते. 'रामरक्षा स्तोत्रातील व्याकरण' लिहून श्री. दिनकर दा. औटी यांनी एक लोकोपयोगी कार्यच केले आहे. शालेय विद्यार्थ्यांनीही उपयुक्त ठरणारे असे हे पुस्तक असून शब्दांची विगतवारी करून त्यांचे संधी, समास, लिंग, वचन, विभक्ती कारक या अंगोपांगाची केलेली सविस्तर चर्चा मार्गदर्शक अशीच आहे.

संस्कृत भाषेचे व्याकरण हे तुलनात्मक दृष्ट्या अन्य भाषा पेक्षा नाही म्हटले तरी जरा क्लिष्टच आहे. शब्दांची रुपे, धातूंची परस्मैपद व आत्मने पद अथवा उभय पदांची रुपे वाक्यांचे प्रयोग (कर्तरी -कर्मणी-भावे), विशिष्ट क्रियापदांना अपेक्षित विभक्ती, उदा. ज्याला द्यायचे, नमन करायचे त्याची चतुर्थी, तसेच ज्याचा उपयोग त्याची तृतिया -'अंधस्य दीपेन किम?' शब्दांच्या संधी संबंधी सुद्धा स्वर, विसर्ग, परसर्ग, व्यञ्जन असे प्रकार, विद्यर्थ क्रियापद रूपे, पूर्वकालवाचक रूपे असे कितीतरी नियम आहेत. शिवाय नियमाला अपवाद ही आहेतच. हे सर्व नियम उपनियम, अपवाद अभ्यासाने अंगवळणी पडतात. दक्षिणेकडे एक गाव आहे. तेथे सर्व आबाल-वृद्ध संस्कृत भाषेतच व्यवहार करतात. भाषा सर्वार्थाने आत्मसात होते. पण बोललेल्या शब्दाचे व्याकरण हा अध्ययनाचा विषय आहे. म्हणून व्याकरणाची माहिती आणि महती जाणून घेणे तसे रोचक आणि आवश्यक असे आहे. लेखकाने परिशिष्ट १ व २ मध्ये याचा विशेष समावेश केला आहे. परिशिष्ट ३ मध्ये श्रीरामाविषयी प्रख्यात सुभाषितांचा अंतर्भाव अधिक माहितीसाठी उपयुक्त आहे. शेवटी एक श्लोकी रामायण व त्याचा अर्थ देऊन वाचकांच्या ज्ञानात भर टाकण्याचा उपक्रमही केला आहे. श्री. औटींचा हा प्रयत्न स्तुत्य असाच आहे. आपल्या मनोगतात त्यांनी 'स्खलन हा मनुष्य स्वभाव आहे. त्यात प्रमाद घडणे शक्य आहे.', असे म्हटले आहे. प्रमादासाठी सूचनांचे आवाहनही केले आहे. 'विद्या विनयेन शोभते' या सूत्रानुसार त्यांच्यासारख्या विद्वत्ता प्रचुर व्यक्तीला ते साजेसेच आहे. संपूर्ण रामरक्षेतील एक-एक श्लोक घेऊन त्याचा अन्वय, अर्थ व व्याकरणाचे बारकावे स्पष्ट करण्याचा हा पहिलाच व अत्यंत यशस्वी असा प्रयोग आहे. परिशिष्ट ५ मध्ये संपूर्ण रामरक्षा स्तोत्र देऊन पाठांतरासाठी ते उपलब्ध केले आहे. या स्तोत्राचे छंदोबद्ध मराठी रूपांतरही करणे हे श्री. औटी यांना कठीण मुळीच नसणार. ते तसे दिले गेले असते तर पुस्तकाची शोभा आणखीनच द्विगुणित झाली असती, असे वाटते. त्यांच्या हातून अन्यही अशा स्तोत्रांचा पाठपुरावा व्हावा, अशी सार्थ अपेक्षा.

**प्रा. अनंत वि. कुलकर्णी**
बी, ६ अंबिका दर्शन सोसायटी,
नाना शंकर मार्ग, विष्णु नगर,
डोंबिवली (प.) - ४२१२०२.
दूरभाष - २४८६१४९

●●●

# श्रीमद्भगवत् गीता (अध्याय १३ वा) ।। क्षेत्र क्षेत्रज्ञ योगः ।।

(सर्व घराघरांसाठी घरातील सर्वांसाठी 'श्रीमद्भगवत् गीता' सर्वांना सहज समजेल अशी)

श्रीमती भिडे यांचा गीतेवरील लेखमालेतील हा १३ व्या अध्यायावरील लेख. - संपादक

गीतेच्या सहा - सहा अध्यायांचे तीन विभाग करायचे अशी प्राचीन पद्धती आहे.

१) **पहिले सहा अध्यायात -(पहिले षटक)**

व्यक्तिगत जीवनात आत्मदर्शन घ्यावयास सांगितले.

२) **दुसरे सहा अध्यायात - (दुसरे षटक)**

विश्वातील आत्मतत्वाचे दर्शन घडवले (सर्व वस्तू जातामधील परमात्मत्वाचे दर्शन)

३) तिसरे सहा अध्यायात- (तिसरे षटक)

त्या परमात्मदर्शन नंतर त्याच्याशी आपले जिव्हाळ्याचे नाते कसे प्रस्थापित करावे याचे दिग्दर्शन.

आता दुसऱ्या षटकानंतरच्या १३व्या अध्यायापासून तिसऱ्या षटकाची सुरवात होत आहे. या अध्यायात 'तू देह नाहीस, तू आत्मा आहेस' 'तत्वमसि' ते आत्मरुप तू आहेस. देहाच्या पलीकडचे अविनाशी, निष्कलंक आत्मतत्व ते 'मी' आहे. हे वरचे देहाचे टरफल तू नाहीस ते निखळ, अविनाशी फळ तू आहेस. हा विचार मांडला आहे, तो मनुष्याच्या अंतःकरणात स्फुरेल त्या क्षणी एक प्रकारचा अननुभूत आनंद (आनंदाचे डोही आनंद तरंग) मनामधे निर्माण होईल. या अध्यायाचे हेच फलित आहे.



अनिर्देश्य व अव्यक्त परमेश्वराचे (बुद्धिने) चिंतन करुन अखेर मोक्ष मिळतो हे जरी खरे आहे तरी त्यापेक्षा श्रद्धेने परमेश्वराच्या प्रत्यक्ष - व्यक्त अशा स्वरुपाची भक्ती करुन परमेश्वरार्पण बुद्धिने सर्व कर्म करीत गेल्याने तोच मोक्ष सुलभ रीतीने मिळतो असे गेल्या अध्यायात सांगितले. परंतु सातव्या अध्यायात जे ज्ञान-विज्ञान सांगण्यास सुरवात केली ते एवढ्यानेच संपत नाही. परमेश्वराचे पूर्ण ज्ञान होण्यास बाह्य सृष्टीच्या क्षराक्षर विचाराबरोबरच मनुष्याचे शरीर आत्मा किंवा क्षेत्र - क्षेत्रज्ञ यांचाही विचार करावा लागतो. तसेच जड प्रकृती पासून सर्व व्यक्त पदार्थ निर्माण होत असले तरी प्रकृतीच्या कोणत्या गुणांमुळे हा विस्तार होतो! त्याचा क्रम काय! हे सांगितल्या खेरीज ज्ञान विज्ञानाचे निरुपण पूर्णहोत नाही. म्हणून या १३व्या अध्यायात प्रथम क्षेत्रक्षेत्रज्ञाना विचार व पुढे चार अध्यायात गुणत्रग विभाग सांगून १८व्यात एकंदर सर्व विषयांचा उपसंहार केला आहे.

गीतारहस्यकात म्हणतात की ही तृतीय षड्ध्यायी स्वतंत्र नसून कर्मयोग सिद्धर्थ ज्या ज्ञानविज्ञानाच्या निरुपणास सुरवात ७व्या अध्यायापासून झालीय त्याचीच पूर्णता या षड्ध्यायीत केलेली आहे.

परमेश्वर सर्व ब्रह्मांड व्यापून किंवा क्षराक्षर सृष्टी व्यापून आहे. असा विश्वरूपदर्शनाने अर्जुनाच्या 'चर्मचक्षुस' प्रत्यक्ष अनुभव आणून दिल्यावर हाच परमेश्वर पिंडात म्हणजेच मनुष्याच्या शरीरात किंवा क्षेत्रात या रुपाने रहात असून या आत्म्याचे म्हणजेच क्षेत्रज्ञाचे जे ज्ञान तेच

या परमात्म्याचेही ज्ञान होय. असा क्षेत्रक्षेत्रज्ञाचा विचार तेराव्यात मांडलेला आहे. निर्गुण परमात्मा ज्याने ज्ञानचक्षुने जाणला आहे तो मुक्त होतो. त्यातही सर्व कर्मे प्रकृती करते आत्मा अकर्ता आहे हे जाणल्याने कर्मे बंधनकारक होत नाहीत. असे कर्मयोगाचे आणि 'ध्यानेनात्मजन पश्यन्ति' (१३.२४) असे भक्तीचे सूत्र कायम राखले आहे.

'हे अर्जुना! या शरीराला क्षेत्र' आणि या क्षेत्राला (शरीराला) जो जाणतो त्याला तत्त्ववेत्ते, ज्ञानी लोक 'क्षेत्रज्ञ' असे म्हणतात. तसेच सर्व क्षेत्रामधे तो मीच आहे हे जाण. क्षेत्र व क्षेत्रज्ञ याविषयीचे जे ज्ञान तेच खरे ज्ञान असे माझे मत आहे. ते क्षेत्र म्हणजे काय, क्षेत्रज्ञ कोणास म्हणतात, त्या दोघांचा एकमेकांशी संबंध काय हे सर्व मी तुला संक्षेपाने सांगतो. या अध्यायाची सुरवात भगवंतांनी स्वतःच आपणहून केली. भक्ती योगानंतर 'क्षेत्र क्षेत्रज्ञ' या विषयाकडे भगवंतांनी का वळावे असा प्रश्न आपल्याला पडतो.

त्यासाठी ११व्या अध्यायापासून विचार केल्यास त्याची संगती लागू शकेल. या अध्यायात अर्जुनाला परमात्म्याचा साक्षात्कार झाला. परंतु आपले व विश्वाचे अस्तित्व या परमात्मस्वरुपात विलीन व्हायची वेळ आली त्यावेळी त्याने भगवंताला आपले रुप आवरण्याची विनंती केली. पुन्हा चतुर्भज रुपात प्रगट हो म्हणून सांगितले. विश्वरुपात त्याने स्वतःला विलीन होऊ दिले नाही. परमात्मदर्शनाचा आनंद त्याला जरुर झाला पण या दर्शनाने त्याचा 'अहं' जळून गेला. तो विनम्र झाला. (भगवंताचा उद्देश हाच होता तो सफल झाला) 'माझ्या साक्षात्कारी । सरे अहंकाराची वारी । अहंकार लोपी अवधारी । व्दैत जाय ॥ (ज्ञाने. ११.६९४)

'अहं' 'मी' पणाची जाणीव हे स्थूल प्रकृतीचे जड प्रकृतीचे लक्षण आहे ते गेल्याशिवाय भगवंताशी जवळीक साधता येणार नाही. आणि त्याशिवाय खरे ज्ञान होणार नाही, निखळ आनंद मिळणार नाही. याची जाणीव झाल्यामुळे आपला 'अहंकार' तसाच रहावा असेही त्यास वाटेना कारण भगवंताची त्याला ओढ लागली होती. म्हणून त्याने निर्गुणाची उपासना करणारा (स्वरुपी एकरूप होऊन) योगी श्रेष्ठ की स्वतः सगुणात राहून सगुणाची भक्ती करणारा श्रेष्ठ! असा प्रश्न १२व्या अध्यायात सुरवातीला केला. आता भगवंतालाही सारा चिद्-विलास संपवून परब्रह्म (निर्गुण निराकार) स्थितीत एकटे एक राहण्याचा कंटाळा आला होता. कारण त्यामुळे त्यालाही आनंदाचा आस्वाद घेता येत नव्हता आणि भक्त व भगवंत हे संबंधरहित विविधतेत राहिले तरी आनंदाचा आस्वाद घेता येत नाही. कारण पोटातल्या घासाला चव नाही नि ताटातल्या घासाला पण चव नाही. अरे अद्वैतात दुसरा कोणी उरलाच नाही तर प्रेमाने अलिंगन कुणाला द्यायचे ? भरभरून कोणाशी बोलायचे? मग अद्वैत झालं तर पुन्हा मी एकटाच, तसेही नको नि द्वैतात दूरता राहिली तरी प्रेमाचा आस्वाद कुठला ? म्हणून द्वैतही नको नि अद्वैतही नको. यालाच ज्ञानदेवांनी 'अद्वय' म्हटले आहे. याचा अर्थ दोन मिळून एक. शिव-शक्ती, पती-पत्नी यांचे अद्वैत. दोन मिळून एकता. नदी सागराला मिळते. तरी नदीचा प्रवाह वेगळा दिसतो, पण मिळतात तिथे एकरुपता. म्हणजे (दोनही नाही नि एकही नाही) असा आस्वादाचा अ-द्वयानंद. हीच सरिता सागर भाव मीलनाची प्रवाही प्रक्रिया भक्तीस्वरुपात मांडली. मन-बुद्धी-अहंकार मला अर्पण कर. म्हणजेच मनाने मद्रुप होऊन लोकहितार्थ कर्मे कर म्हणजेच 'अनन्य' हो. असा भक्तीयोग भगवंताने अनेकदा पुन्हा पुन्हा सांगितला आहे भगवत् गीतेत.

भक्ताने सगुणोपासना कशी करावी ते सांगितले पण 'अनन्य' होण्यासाठी (परमात्म्याशी मनाने, एकरुप होण्यासाठी) 'मी देह नाही या प्रकृतीहून मी वेगळा आहे. मी 'आत्मा' (पुरुष-अक्षर) आहे हे जाणणे आवश्यक होते. यासाठीच भगवंतानी या १३ व्या अध्ययात 'क्षेत्र क्षेत्रज्ञाचा विषय आपणहून सुरू केला. सोन्याचा अलंकार घडवताना त्याला अग्नित तापवून, उजळवून ठाकून ठोकून कला

कुसरीनं उत्तम, सुंदर घडवला जातो की तो सोन्यासारखाच झळकला पाहिजे. त्याप्रमाणेच अर्जुनाला आपल्यासारखाच ज्ञानी परिपूर्ण बनवण्यासाठी सर्व प्रकारचे ज्ञान ठासून ठोक भरविण्याचा भगवंताचा अटोकाट प्रयत्न चालला होता.

१२ व्या अध्यायात अर्जुनाने सगुण आणि निर्गुण उपासकामध्ये श्रेष्ठ कोण म्हणून प्रश्न केला. भगवंतांनी त्याचे संक्षेपाने उत्तर देताना २ ते ५ श्लोकात निर्गुण उपासनेचे स्वरुप व त्याचे फळ आणि सामान्यांना ही उपासना करणे कठीण आहे, वगैरे सांगितले त्यानंतर ६ ते २० श्लोकात सगुण उपासनेचे महत्त्व, फळ प्रकार आणि श्या भक्ताची लक्षणे सांगितली. तसेच ही उपासना सामान्यांना सुलभ सोपी असल्याचेही सांगितले. आणि हे सांगता सांगता अध्याय संपून गेला. (हा अध्याय लहानसा २० श्लोकंचाच आहे.) निर्गुण तत्वाचे महत्त्व फळ आणि त्याची साधना विस्तारपूर्वक सांगायला जमलेच नाही. म्हणून निर्गुण निराकार तत्वाचे अर्थात ज्ञानयोगाचे सविस्तर विवेचन व विश्लेषण करण्यासाठी 'क्षेत्रक्षेत्रज्ञ'चा विषय सांगायला स्वत:च सुरवात केली. भगवत् गीता सर्वच पवित्र आहे. परंतु गंगेचा प्रवाह सर्वत्र पावन पवित्रच असला तरी त्यावर हरिद्वार, काशी प्रयाग अशी अधिक पवित्र तीर्थक्षेत्रे असतात तसेच भगवत गीतेतील काही अध्याय तीर्थक्षेत्रे झाले आहेत. अकराव्या अध्यायाला ज्ञानेश्वर प्रयाग क्षेत्र म्हणतात. १२ व्या अध्यायाला भगवंतच अमृतधार म्हणतात.

सुरवातीच्या दोन श्लोकात क्षेत्र क्षेत्रज्ञ कोणाला म्हणतात, हे सांगितले आहे तर दुसऱ्या श्लोकातच क्षेत्रज्ञ म्हणजे मी परमेश्र असे क्षेत्रज्ञाचे स्वरुपही सांगितले आहे. गीता रहस्यकार म्हणतात इथे 'चापि' म्हणजे 'सुद्धा' या शब्दामुळे क्षेत्रज्ञच नव्हे तर क्षेत्रसुद्धा मीच आहे असा अर्थ होतो. कारण क्षेत्र किंवा शरीर ज्या पंचमहाभूतांचे बनते ती प्रकृतीपासून झालेली असून प्रकृती ही परमेश्वराचीच कनिष्ट विभूती आहे. हे सात व आठ (७.४, ८.४, ९.८) व नऊत वर्णिले आहे. दुसऱ्या श्लोकाच्या अखेरीस क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांचे जे ज्ञान तेच माझे म्हणजे 'परमेश्वराचे ज्ञान' समज असेही सांगितले आहे.

वेद, उपनिषदे, महर्षि व्यारचित ब्रह्मसुत्रे व इतरही अनेक ऋषींनी 'क्षेत्र क्षेत्रज्ञ' या विषयावर आपापली मते मांडली आहेत. त्यात मतभेद आहेत काहींच्या मते क्षेत्रात 'जी' प्रमुख, तर काहींच्या मते 'प्रकृती' प्रमुख, काहींना आदी संकल्प सारे रचतो असे वाटते, तर काहींना वाटते काळ हाच सृष्टिचा संहार कर्ता. त्यामुळे याबाबत सर्वांत एक मत नाही. या शरीराला क्षेत्र का म्हणतात? ते कसे आहे? त्यावर सत्ता कोणाची? क्षेत्र क्षेत्रज्ञाचा संबंध काय? ब्रह्मदेव व शंकर यांनी सुद्धा यासाठी अट्टाहास केला. पण निश्चित निर्णय झाला नाही. प्रकृतीवादी, संकल्पवादी, स्वभाववादी, काळवादी यांनी मते मांडली पण निर्णय नक्की झाला नाही. वेदातील ब्रह्मसूत्रांना पण निर्णय लागला नाही ते ज्ञान मी तुला सांगतो. असे भगवंत म्हणतात. (भगवत् गीतेत ही मते सांगितलेली नाहीत पण ज्ञानेश्वरीत ती सांगितली आहेत.

क्षेत्र म्हणजे पंच महाभूते, अहंकार, बुद्धी, मूळ प्रकृती तसेच दहा सूक्ष्म इंद्रिये, एक मन आणि पाच इंद्रियांचे पाच विषय. हे जरा सविस्तर बघू - क्षेत्र - शरीर - देह हे ३६ तत्वांचे मिळून बनले आहे. ती कोणती ते पाहू -

१-५ **पंचमहाभूते** -(पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश)

६ **अहंकार** - पंच महाभूतांशी गाठ पडल्यावर देहाचा आकार स्पष्ट होतो. हा मायेच्या पोटात राहतो व देहाला नाचवतो.

७ **बुद्धी** - सुख-दु:ख, बरे-वाईटाची निवड करते.

८ **अव्यक्त** - सूक्ष्म रुपाने

१ ते १८ **पाच ज्ञानेंद्रिये** - नाक, कान, डोळा, त्वचा, जिव्हा

**पाच कर्मेंद्रिये** - हात, पाय, वाणी, उपस्थ, गुद

२० ते २९**ज्ञानेंद्रियांचे ५ विषय** - शब्द, रस, रुप, गंध, स्पर्श

**कर्मेंद्रियांचे ५ विषय** - देणे घेणे, चालणे, बोलणे, काम, मलमूत्र विसर्जन

३० **इच्छा** - ज्यामुळे विषयाची गोडी उत्पन्न होते.

३१ **द्वेष** - इच्छित वस्तू मिळाली नाही तर उत्पन्न होतो.

३२ **सुख** - वस्तू मिळाली की सुख होते.

३३ **दुःख** - सुखाच्या विरुद्ध

३४ **चेतना** - जडाला सचेतन करणारी (जीवंत करणारी)

३५ **धृति** - पंचमहाभूते परस्परातील स्वभावावर विसरून देहात मैत्रीने राहतात ती धृती.

३६ **संघात** - वरील ३६ तत्वांच्या समुदायाला 'संघात' म्हणतात. ही ३६ तत्वे मिळून शरीर बनते. या शरीरात पाप-पुण्य निर्माण होते. म्हणून यास क्षेत्र म्हणतात.

याची व्याप्ती एवढी आहे की सर्व स्थावर जंगम सृष्टीचा या क्षेत्रात समावेश होतो.

**ज्ञान** - साधकाला, जीवाला शिवाची भेट करून देण्याचे सामर्थ्य या ज्ञानात आहे. क्षेत्र क्षेत्रज्ञाचे ज्ञान हेच खरे ज्ञान.

देह व आत्मा हे वेगवेगळे आहेत, हे जाणणे म्हणजे ज्ञान. हे ज्ञान मिळवण्यासाठी तपी, योगी, मुनी वेदान्ती हे आपापल्या मार्गांनी साधनांची पराकाष्टा करतात. हे ज्ञान मिळवायला काही गुण आवश्यक आहेत.

१) अत्यंत नम्र, विनयशील, विद्वतेची प्रौढी न मिरवणारा

२) पुण्यांचे प्रदर्शन न करणारा

३) प्राणीमात्रांविषयी प्रेम, दया, अहिंसा असणारा

४) शांती ढळू न देणारा

५) आर्जव - सर्वांशी प्रेमाने बोलणारा

६) गुरुभक्ती - गुरुची अहर्निश सेवा

७) शुचित्व - आत विमल आत्मज्ञान बाहेर शुद्ध कर्माचरण. स्फटीकाच्या तावदानातील दीपाप्रमाणे शोभणारा.

८) स्थैर्य - दुःखे खचत नाही, सुखाने हुरळून जात नाही. सुख दुःखात स्थिरबुद्धीने राहतो.

९) मनोनिग्रह - इंद्रियांवर ताबा

१०) वैराग्य - ऐहिक भोगाबद्दल अरुचि, एकान्तांची आवड

११) कर्माचा अभिमान नाही

१२) जन्ममृत्यू - जरा - व्याधी याची जाणीव

१३) देहाची व स्त्री पुत्रांची आसक्ती नसणे

१४) समचित्त - सुख दुःखात स्थिर चित्त

१५) एका परब्रह्माची काया वाचा मने भक्ती सेवा

१६) एकान्त प्रिय, लोकांचा कंटाळा

१७) परमात्मा एक खरा बाकीचा वाऊगा पसारा हा निश्चय झालेला.

१८) मन, बुद्धी शुद्ध करून परब्रह्माचा साक्षात्कार होतो. सर्वत्र अनुभवाला येते. ही ज्ञानाची १८ लक्षणे त्यासाठी साधना म्हणजे स्थितप्रज्ञासारखे राहणे.

ज्ञाता - (क्षेत्र) ज्ञान घेणारा शरीरधारी जीव

ज्ञान - (गुण) या ज्ञानाशिवाय परब्रह्म प्राप्त होत नाही.

ज्ञेय - (परब्रह्म) हे निर्गुण निराकार

ज्ञाता-ज्ञान व ज्ञेय सारे एकच परब्रह्म याला 'त्रिपुटी' म्हणतात. ज्ञाता-ज्ञान त्याच्यापासूनच निर्माण झालेले ते ज्ञेय तोच. अवघा एक आत्माच आहे. पण हे बुद्धीला पटत नाही म्हणून क्षेत्र, ज्ञान-अज्ञान व ज्ञेय असे चार भाग करून सांगावे लागले असे ज्ञानदेव म्हणतात.

क्षेत्र क्षेत्रज्ञाला कपिल मुनींचे सांख्यशास्त्र प्रकृती पुरुष म्हणते.

| पुरुष (क्षेत्रज्ञ) | प्रकृती (क्षेत्र) |
|---|---|
| निर्गुण, निराकार<br>अकर्ता, अभोक्ता<br>केवळ पुरुषाला जन्मही<br>नाही, भोगणेही नाही | गुणमयी प्रकृती, पुरुषाचे सर्वस्व बनून त्याला बंदिस्त करून संसार करायला लावते व जगाची उभारणी होते. पुरुषाने प्रकृतीचा संग केल्यामुळे त्याला जन्म मरणाची अनर्थ परंपरा भोगावी लागते. ते प्रकृती गुणांमुळे वाटते. पण प्रत्यक्षात त्यावर तो आळ आला आहे. |

हा पुरुष प्रकृतीचा विचार (ज्ञान) ज्यांनी जाणला ते पुरुष देहता राहूनही मोहाला भूलत नाहीत. हे ज्ञान साधनेद्वारे म्हणजेच ध्यान, ज्ञान, कर्म, भक्ती या योग मार्गाने साध्य करतात. ज्यांना हे ज्ञान नाही ते गुरुला शरण जातात व त्याप्रमाणे वागतात. व तेही मुक्त होतात. या चित्रविचीत्र भूतांना व्यापून असणारी वस्तू एकच व अविनाशी आहे. भाग्यवान (ज्ञानी) लोकांनाही अनेकातली एक वस्तू (ब्रह्म) दिसते, पाहतील तिकडे ब्रह्म दिसते. विविधतेतील एकता दिसणे हेच ब्रह्मज्ञान, हाच मोक्ष हीच परमात्म प्राप्ती. क्षेत्र क्षेत्रज्ञाचे ज्ञान हेच खरे ज्ञान आणि स्वत: भगवंत हेच 'क्षेत्रज्ञ' आहेत.

सातव्यातले 'ज्ञान-विज्ञान' येथे क्षेत्र-क्षेत्रज्ञ या स्वरुपात सांगितले आहे. तेथे विश्वातील ज्ञान विज्ञान सांगितले इथे शरीरातील ज्ञान विज्ञान सांगतात. क्षेत्र-विज्ञान, क्षेत्रज्ञ-ज्ञान म्हणजेच 'परमतत्व' वा 'पुरुष' वा 'आत्मा' आहे.

मी देह नसून आत्मा आहे हा अनुभव येणे महत्त्वाचे. आपण आत्मा व तो परम आत्मा असे आपण अनन्य झालो म्हणजे 'योग' साधतो. या योगानुभवातूनच 'भक्ती' साधणे शक्य होते. देहापासून आत्मा अलग करून त्याची पूजा करावी. पण आपण सारे देवाची पूजा न करता देहाची पूजा करतो. देहाचे चोचले पुरवतो. त्याला शृंगारतो. विनोबाजी म्हणतात, देह न नटवताच छान दिसतो. त्याला चौकड्याचे, फुलांचे पानांचे, रेघांचे वस्त्र कशाला हवे? मग देवानेच नसते का शरीरावर वाघासारखे पट्टे ओढले असते, फुल-पाखरासारखी नक्षी काढली असती. पण तसे केलेले नाही. कारण तो म्हणतो, तो म्हणतो देहाला सजवण्यापेक्षा मन शृंगार, बुद्धीचा विकास कर, हृदय सुंदर बनव. या देहावर माझी सत्ता चालली पाहिजे. माझ्यावर देहाची नाही. मागे चोर व शिपाई आणि राजा व शिपाई यांची गोष्ट मी या संदर्भात सांगितली होती. चोराभोवती शिपाई असतात तेव्हा चोरावर शिपायांची सत्ता चालते व राजाच्या भोवती शिपाई असतात तेव्हा राजाची शिपायांवर सत्ता चालते. शिपाई

म्हणजे इंद्रिय. त्याची सत्ता मनावर चालली तर आपण चोर ठरणार आणि मनाची इंद्रियावर चालली तर आपण राजा ठरणार. मग कोण व्हायचे आपण ! चोर की राजा, हे ज्याचे त्याने ठरवायचे. देह काम करतोय तोवर वापरायचा तो बेकाम झाला की टाकून द्यायचा.

देहाहून मी अलग आहे ही गोष्ट पक्की ध्यानात ठेवा. देहाची आसक्ती, देहाबद्दल भीती (संकटांची भीती) सोडा म्हणजे तुम्ही सम्राट व्हाल. विनोबाजी एक सुंदर उदाहरण देतात. एका राक्षसाचा माणुस गुलाम असतो. तो त्याला कामे करायला लावतो नाहीतर खाऊन टाकीन अशी धमकी देतो. माणूस मृत्यूच्या भितीने कामे करतो. पण नंतर नंतर त्याला ही जुलूम, जबरदस्ती असह्य होते. तो शेवटी ठरवतो नि म्हणतो, 'टाक खाऊन'. माणसाची देहाची आसक्ती व देहाबद्दलची भीती संपते. तेव्हा राक्षस त्याला खात नाही कारण खाल्ले तर त्याची कामे कोण करेल ! मग जुलूम थांबला. देहाची आसक्ती सोडली की आपण स्वतंत्र. सुख, दुःख, पीडा ही देहाची आहेत. मी म्हणजे जर देह नाही आत्मा आहे हे मनाशी पक्के झाले की हे काहीच माझे नाही मी मुक्त.

सॉक्रेटीसची एक गोष्ट ते सांगतात. सॉक्रेटीसला विष देऊन मारण्याची शिक्षा झाली. 'मी म्हातारा झालोय उद्या मरायचे ते आज मरेन. मरण्याच्या आदल्या दिवशी तो शिष्यांना आत्म्याचे अमरत्व, देहाचे क्षणभंगुरत्व वगैरे सांगत होता, तेवढ्यात एक शिष्य म्हणाला, 'तुम्ही मेल्यावर तुम्हाला पुरायचे कुठे?' त्यावर सॉक्रेटीस म्हणाला 'ते मला मारणार नि तू मला पुरणार ! मला कोण पुरणार ! मीच सर्वांना पुरून उरणार आहे? आणि सॉक्रेटीस जाऊन इतकी वर्षे झाली तरी त्याचे नाव मागे उरले आहे. तो अमर झालाय.

देहाची आसक्ती, चिंता, काळजी सोडा. जंगलातील प्राणी, पक्षी आपल्याला कोणी खाईल, मारेल म्हणून किती घाबरलेले असतात. ('डिस्कव्हरी' मध्ये आपण बघतो.) तसे आपण का घाबरायचे ! त्या विश्व चालक शक्तीवर विश्वास ठेऊन निश्चिंत रहा. आईच्या मांडीवर मूल किती विश्वासाने गाढ झोपते. तुम्ही पण त्या परमात्म्याच्या अंकावर विश्वासून शांत झोपा. त्या शक्तीवर विश्वासून प्रेमाने, जाणूनबुजून निवांत निजण्यास शिका. त्यामुळे त्या शक्तीवर माझे जीवन अवलंबून आहे. तिचा परिचय होईल, प्रतीती येईल, असा अनुभव आला की विकास होईल. मोक्ष मार्गाकडे -

भगवान देहापासून आत्मा अलग किती केला पाहिजे, याचे उदाहरण म्हणजे येशूख्रिस्त. विनोबाजी म्हणतात, त्याला क्रुसावर चढवून खिळे हातापायाला ठोकतात, तेव्हा तीव्र वेदनांनी तो ओरडतो, 'हे काय करता?' पण क्षणभराने तो स्वतःला सावरतो मग म्हणतो, 'देवा तुझी इच्छा पूर्ण होवो. या पामरांना क्षमा कर. आपण काय करतो हे यांना कळत नाही. इतका आत्मा देहापासून अलग केल्यावर देह टरफलाप्रमाणे गळून पडतो. येशू अमर होतो. नारळाचे रोजचे उदाहरण पहा. खोबरे ओले असते नारळातले तेव्हा ते कवचाला चिकटलेले असते. नारळ फोडल्यावर कवचाबरोबर खोबऱ्याचेही दोन भाग होतात. पण खोबरे वाळले (नारळ सुकला) की आतला गोटा गुडगुड वाजतो. नारळ फोडला तरी गोटा तुटत नाही तो तसाच राहतो. कवच तुटून जाते. तसाच देहापासून आत्मा अलग झाला पाहिजे.

हे सारे करावयास नैतिक साधनेचे पाठबळ पाहिजे, खंबीर पाया पाहिजे. सत्य-असत्य याचा विवेक करुन सत्य घ्यायचे. सारासार विचारेन सार घ्यायचे, अशी जीवनास सुरवात करायची. पुढे आत्म प्रयत्न व परमेश्वरीकृपा यावर पुढे मार्गक्रमण करीत राहायचे.

ज्ञान बुद्धिने जाणले पाहिजे, जीवनात उतरले पाहिजे, हृदयात मुरले पाहिजे. आपल्या आचरणातून, अवयवातून प्रकट झाले पाहिजे.

या तेराव्या अध्यायात या साधनेचा क्रमही दिग्दर्शीत

केला आहे. १) उपद्रष्ट - जोपर्यंत माणसाला देहातल्या आत्म्याचा विचारच नसतो तोपर्यंत तो खेळतो, खातो, झोपतो या दैहिक क्रियात तो गुरफटलेला असतो. तोपर्यंत आत्मा नुसता पाहतो. जसे मूल जर रांगत रस्त्याकडे जाऊ लागले तर आई लक्ष ठेऊन असते. तसा आत्मा लक्ष ठेवून असतो. (अजून विकासाची सुरवात व्हायची आहे.) या स्थितीला 'उपदृष्टा' म्हणतात. साक्षी रूपाने सर्व बघणारा.

२) पुढे तो जागा होतो. पशूही असे जीवन जगतात याची त्याला जाणीव होते. मग स्वैरक्रिया जाऊन विवेक येतो. स्वच्छंदपणा जाऊन संयम येतो. या नैतिक भूमिकेवर जीव आला की आत्मा त्याला अनुमोदन देतो. 'शाब्बास' म्हणतो. (आतला आवाज) आता आत्मा अनुमंता होतो. आई जशी मुलाला शाबासकी देते. कौतुक करते.

३) मग तो जीव मनाचे मळ धुण्याचा प्रयत्न करतो. या प्रयत्नात तो थकतो. आपले प्रयत्न अपुरे आहेत हे कळल्यावर तो देवाला आर्ततेने साद घालतो. द्रौपदी प्रमाणे हाका मारतो. आता परमात्मा अधिक जवळ येतो साह्य करतो. अशाप्रकारे परमेश्वरच माझ्या जीवनाचा महेश्वर होतो. मग सारे जीवनच ईश्वरमय होते. जगाचा सेवक सूर्यनारायण दाराशी येतो अनंत (किरणांनी) हस्तांनी द्यायला. सगळे घर प्रकाशाने भरून टाकतो. आता तो उपदृष्टा अनुमंता न राहता भर्ता (मदत करणारा होतो) होतो. मग तो कबिराचे शेले विणतो. नाथा घरी चंदन उगाळतो. सखुचे पाणी भरतो. जनीला दळू लागतो. द्रौपदीला वस्त्र पुरवतो.

४) याच्या पुढची पायरी म्हणजे परमेश्वर कृपेने कर्माचे फळ मिळाले ते फळही स्वत: न घेता देवाला द्यायचे. अशाप्रकारे जीवनाची सारी कमाई ज्याने दिली त्यालाच अर्पण करायची 'अर्घ्य देतो तसे' परमात्मा असा उपदृष्टा - अनुमंता - भर्ता - भोक्तो होतो.

आता शरीरात परमात्माच भोग भोगतो आहे. या भूमिकेवर जीव देतो. मग संकल्प करणेही सोडून देतो.

१) संकल्प २) कार्य करणे ३) फळ मिळणे ४) फळही त्यालाच अर्पण करणे.

कर्म करणारा - परमेश्वर

फळ चाखणारा - परमेश्वर

परमात्मा - प्रकृती पुरुष रुप परब्रह्म. तो देहात परम पुरुष असतो तेव्हा साक्षी, कार्यांना अनुमती देणारा, कर्म-प्रेरक, भरण पोषण करणारा भोक्तो, सर्वश्रेष्ठ, अध्यक्ष, परमात्मा सुद्धा म्हणतात.

सर्व चर अचर विश्व या क्षेत्र-क्षेत्रज्ञाच्या संयोगातून निर्माण झालय. ते सर्व भूतात समभावाने राहते. भूतांचा नाश झाला तरी त्याचा नाश होत नाही. हेच खरे दर्शन.

आत्म्याची व्याख्या भगवंतानी अशी केली आहे. अनादि निर्गुण, सर्व शरीरात अकर्ता, अलिप्त, आकाशवत, सर्वव्यापी, सूर्यवंत, सर्व प्रकाशक असा आत्मा. ज्ञानचक्षुने तो क्षेत्र व क्षेत्रज्ञ यातील अंतर जाणतो. तो प्रकृती तत्वातून सुटका कशी करून घ्यावी हे जाणतो. तो परमत्वाला प्राप्त करून घेतो. हाच १४ व्या अध्यायाचा विषय आहे.

सूर्याची किरणं भिंगातून एका बिंदूत एकत्र येऊन प्रखर होतात की त्यामुळे भिंगाखाली कागद धरला तर तो खाली काळा पडतो. (सर्व किरणाचं तेज एका बिंदूत गोळा होते) तसेच मानवी व्यक्तिमत्वात विश्वात्म्याची समग्रता एका बिंदूत सामावते. तो विराटाला सामावून वामन झालेला बिंदू म्हणजेच प्रत्येक भूतातला आत्मा.

ज्ञानी माणूस निरहंकारी असतो. भरली घागर मौनावते (ती हिंदकळत नाही) अर्धी वाचाळ बनते. उथळ पाण्यालाच खळखळाट असतो. खोल पाणी स्थिर, शांत असते. ज्ञानी व्यक्तीचा इंद्रियावर ताबा असतो कारण तो प्रकृतीचा स्वामी असतो. त्यामुळे तो धीर, गंभीर, शांत समाधानी असतो.

पुरुष प्रेरक. त्याच्या सान्निध्यात प्रकृती कार्यरत होते. विश्वातील प्रत्येक वस्तू हे शिवशक्तीच्या मीलनाचे प्रत्यक्ष दर्शन आहे. शिव शक्ती (पुरुष प्रकृती) हे आदि द्वंद्व. शिव शक्तीसहच असतो. शक्तीशिवाय शिव व्यक्त होऊ शकत नाही व शिवाशिवाय शक्ती कार्यरत होऊ शकत नाही. 'ज्ञानाविना कर्म आंधळं नि कर्माविना ज्ञान पांगळं आहे. दोन मिळून ते एक आहेत. शिवाचा प्रकाश-शक्ती (प्रकृती) शिवशक्ती हे अर्धनारी नटेश्वराचे रूप आहे. शिवाशिवाय शक्ती अपूर्ण व शक्ती शिवाय शिव अपूर्ण. दोघांनाही समान महत्त्व आहे तर आजच्या समाजात स्त्रियांना दुय्यम दर्जा का दिला जातो. तिची भ्रुण हत्या का होतेय ! कोणाही एकामुळे जग, ही सृष्टी चालणार नाहीये मग अ-द्वयानंद का उपभोगू नये ! तोच तर परमानंद आहे.

प्रकृतीच नवी नवी रूपे घेते, सारा खेळ हिचाच. प्रत्येक ठिकाणी साक्षी म्हणून आत्मा आहेच. प्रकृतीच्या संगाने विविध योनींत तो जन्मतो व तेथील सुखदुःखे भोगतो. यामुळे अमुर्ताची मूर्ती दिसते. निराकारास आकार येतो. पुरुष प्रकृतीतून व्यक्त होतो. दोघांच्या संगामुळे विश्व साकार होते. एकच पुरुष तत्व विविधतेनं नटलंय हे ज्ञान म्हणजेच समग्र ज्ञान. विजेवर चालणारी विविध उपकरणं, विविध रंगाची आकाराची असतात, त्याचं कार्यही वेगवेगळं असतं. पंखा-गारवा देतो, दिवा-प्रकाश, फ्रीज-थंडपणा, गीझर-गरमपणाही, व्हीं-चित्र दाखवतो, रेडिओ-आवाज ऐकवतो. एक विजेचं बटण दाबलं की सर्व उपकरणे आपापली कार्ये करतात. हा विद्युत प्रवाह म्हणजे परमात्म तत्व (चैतन्य) व उपकरणं म्हणजे प्रकृती.

जे जगात सूर्याचे स्थान तेच शरीरात आत्म्याचे. तो काहीही करत नाही पण त्याच्यावाचून काहीही होत नाही. आत्मस्वरुपाची ओळख होणे. मी देह नाही आत्मा आहे हे ज्ञान होणे. प्रकृतीपासून आत्मा अलग करणे म्हणजेच मोक्ष, ईश्वर प्राप्ती. रविंद्रनाथ टागोर, सावरकर, टिळक असेच सुख दुःख पलीकडे गेलेले खरे कर्मयोगी होते.

भगवान श्रीकृष्ण आपल्या अवतार समाप्तीच्या वेळी उद्धवाला म्हणाले की, निजधामाला जातोय. त्यावेळी उद्धवाला दुःख अनावर होऊन तो म्हणाला मी तुझ्याशिवाय कसा राहू मलाही घेऊन चल. तेव्हा भगवंत रागावले, म्हणाले, तुला कसा नेणार ! माझे ज्ञान मी तुला देऊन जाणार आहे. सूर्याने नाही का अस्तास जाताना अग्निजवळ आपले तेज ठेवून दिले. भगवंत निजधामास गेले. पण उद्धवाला काहीच वाटले नाही तो नेहमी सारखाच वागत होता. कारण त्याला भगवंताने ज्ञान दिले होते म्हणून कृष्णाची सगुणमूर्ती नाहीशी झाल्याचे दुःख त्याला झाले नाही. रविंद्रनाथ,टिळक, सावरकर या तिघांनाही पुत्रशोक झाला तरी त्यांनी आपले कर्तव्यकर्म सोडले नाही. ज्ञानी आप्तस्वकीयांपासून अलिप्त असतात, अनासक्त असतात. 'सर्वं खल्विदं ब्रह्म' हे विश्व म्हणजे परमात्म्याचाच प्रकाश आहे. सारे ब्रह्मच विविध रुपात नटलंय असं पाहणे हीच मुक्ती हाच मोक्ष, हीच ब्रह्मप्राप्ती हेच ब्रह्मज्ञान. सारी विविधता एकत्वाने पेललेली आहे. ही जाणीव हाच समतावाद, हेच समदर्शन. उद्धव प्रथम सगुण भक्ती करायचा पण नंतर तो निर्गुणाची भक्ती करू लागला. सगुण पुढे पण निर्गुण त्यामागून आलेच पाहिजे. एरव्ही परिपूर्णता नाही म्हणून सगुणाला निर्गुणाचा आधार तोडता येत नाही व निर्गुणाला सगुणाचा ओलावा हवा असतो. सगुणाला निर्गुणात जावं लागतं, निर्गुणाला सगुण व्हावं लागतं.

परब्रह्माचे वर्णन आपण निर्गुण, निराकार, व्यापक, अक्षर, अनादि, मूलतः आहे असे करीतो. तरीही त्यास आहे (सद्) अगर नाही (असद्) काहीच म्हणता येत नाही. 'जे नाही म्हणो जाईजे । तरी विश्वाकारें देखिजे । आणि विश्वचि ऐसे म्हणिजे । तरी हे माया ॥ - ज्ञानदेव

आत्मा आकाशाप्रमाणे सूक्ष्म, सर्वव्यापी, अनादि, निर्गुण सर्व शरीरात व्याप्त, अकर्ता, अलिप्त व सूर्याप्रमाणे सर्व प्रकाशक आहे. सूर्य जगताचा आत्मा तर आत्मा शरीराचा सूर्य आहे. आत्मा काय किंवा परमात्मा काय

दाखवता येत नाहीत. पण सृष्टिच्या गतीमानतेला, परिवर्तनाला, विकसनाला, प्रकाशाला, उर्जास्रोत त्याच्यापासूनच मिळतो ना! त्यालाच परमात्मा म्हणायचे. (त्या विराट विश्वशक्तीला) आकाशवत् तो सर्वत्र सर्व वस्तूमात्रात सूक्ष्म रुपाने भरला आहे. तो जवळही आहे, दूरही आहे (आकाशाप्रमाणेच) प्रत्येक क्षेत्राचे कार्य सूर्याप्रमाणे त्याच्याच उर्जास्रोताने चालले आहे.

अर्जुनाला आपली प्रकृती जीवंत रहावी वाटले, याचा अर्थ भगवंत म्हणतात की ते व्यक्तित्व 'प्रकृती' या पातळीवर नसावे. ते आत्मतत्वावर अधिष्ठीत असावे, यासाठी 'प्रकृतीपुरुष' विवेचन केले आहे. तसेच भक्त होण्यासाठी (भगवत्‌भाव प्राप्त होण्यासाठी) क्षेत्र-क्षेत्रज्ञाचे वर्णनही केले आहे. आत्मानुभूतीच्या पातळीवरुन 'भगवंताचा अनन्य भक्त होता येते. त्यासाठी ध्यानाने, ज्ञानाने, कर्मयोगाने हा अनुभव घेता येतो किंवा गुरुकडूनही हे ज्ञान मिळवता येते.

पुढे चौदाव्या अध्यायात हेच ज्ञान पुढे चालू असून एकच आत्मा अगर परमात्मा सर्वत्र असतानाही सत्व, रज, तम या प्रकृतीच्या गुणांच्या भेदामुळे जगात वैचित्र्य कसे निर्माण होते हे प्रकृतीचे खेळ (माया) जाणून आपण कर्ता नाही हे ओळखून परमेश्वराची - अनन्य होऊन भक्तीभावाने सेवा करतो तोच त्रिगुणातीत होता हे सांगितले आहे. स्थितप्रज्ञ, भक्तीमान पुरुष व त्रिगुणातीत एकच हेही विवेचन पुढील अध्यायात आले आहे. ते अर्जुनाचे प्रश्नावरुनच.

- आशा भिडे

बी/९, विजय अपार्टमेंटस्,
'आराधना' टॉकीजजवळ,
ठाणे (प.) - ४०० ६०२.
फोन : २५४१ ०१४०

(पान ११ वरून चालू)

## सार्वजनिक वाचनालय कल्याण

कोळसेवाडी, मिलिंदनगर, खडकपाडा, आधारवाडी आदी भागात वाचनालयाच्या शाखा उघडण्यासाठी वाचकवर्गांची सतत मागणी होत असते. शतकोत्तर सुवर्ण महोत्सवात वाचनालय विस्ताराचे मोठेच कार्य हाती घ्यावे लागणार आहे. आजच्या एकविसाव्या शतकाचा विचार करता वाचनालयाचे आधुनिकीकरण तसेच संगणीकरण होणे अत्यंत आवश्यकआहे. या आधुनिकीकरण व संगणकीकरणामुळे वाचन सेवेत अधिकाधिक तत्परता आणी येणार आहे. त्याचप्रमाणे दुर्मिळ ग्रंथांचे संरक्षण करता येणार आहे.

आजवरच्या वाचनालयाच्या जडणघडणीत वाचनालयाचे सरचिटणीस रा. अ. उर्फ रामभाऊ जोशी यांचा सिंहाचा वाटा आहे. गेली पस्तीस वर्षे एकही मानधन न घेता ते वाचनालयाची सेवा करीत आहेत. सध्या श्री. अ. ना. भार्गवे संस्थेचे अध्यक्ष असून, प्रा. उदय सामंत, ॲड. किशोर देशपांडे हे वाचनालयाचे विश्वस्त आहेत. श्री. अ. रा. आपटे हे उपाध्यक्ष असून प्रशांत मुल्हेरकर व नी. र. काळे हे चिटणीस तर श्री. विलास जोशी खजिनदार आहेत. या सर्वांच्या अथक परिश्रमास श्री. निशिकांत बुधकर, जनार्दन ओक, रविंद्र सिंग, उदय सुरते, वा. कृ. ताम्हनकर, मुरलीधर मगर, भा. का. भावसार, श्रीमती उर्मिला देव आदि कार्यकारिणी सभासदांचे बहुमोल सहकार्य वाचनालयास लाभत आहे.

●●●

दिशा
नियमित वाचा.

# नाटक नाम सूची

*मुंबई मराठी साहित्य संघ ही मुंबईतील जुनी व महत्त्वपूर्ण साहित्य संस्था. या संस्थेच्या ग्रंथालयात गतवर्षी वांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथालय शास्त्राच्या माजी विद्यार्थिनींनी काही महिने कंत्राटी पद्धतीने विशिष्ट काम केले. या दरम्यान या संस्थेचा नाट्य क्षेत्रातील लौकिक व योगदान लक्षात घेता या संस्थेच्या ग्रंथालयात असणाऱ्या नाटकांच्या संहितांची सूची या विद्यार्थिनींनी केली. ही सूची 'दिशा' मधून, संदर्भासाठी उपलब्ध व्हावी, या हेतूने देत आहोत. सूची करणाऱ्या विद्यार्थिनी **सौ. छाया मोहिते व पल्लवी तडस या होत. (शै. वर्ष १९९९-२०००)***

*- संपादक*

| क्र. | नाटकाचे नाव | लेखकाचे नाव | वर्ष |
|---|---|---|---|
| १ | अग्रेरना सवाल | कानेटकर, वसंत | १९७४ |
| २ | अग्रहार | असमोडिकर, कृ.ना. | १९२६ |
| ३ | अगा जे घडलेची नाही | लिमये, नाना | १९६५ |
| ४ | अजगर आणि गंधर्व | तेंडूलकर, विजय | १९६६ |
| ५ | अजब न्याय वर्तुळाचा | खानोलकर, चिं. त्र्यं. | १९७४ |
| ६ | अट्‌पाव सुतार, पावशेर, न्हावी, सव्वाशेर शिंपी | सवनीस, वसंत | १९६१ |
| ७ | अर्ध्यांच्या शोधात | फडके, श्याम | १९७३ |
| ८ | अनुतापशमन | रानडे, शं. मो. | १८८१ |
| ९ | अपराध मीच केला | कालेलकर, मधुसूदन | १९७० |
| १० | अबोल झालीस का? | कालेलकर, मधुसूदन | १९६८ |
| ११ | अबोल झाली सतार | दारव्हेकर, पु. | १९६८ |
| १२ | अमृत सिद्धी | देसाई, व. ना. | १९३३ |
| १३ | अमृत | सागणेकर, मो. ग. | १९५८ |
| १४ | अमृत वेल | कालेलकर, मधुसूदन | १९७२ |
| १५ | अमृत झाले जहराचे | गोखले, विद्याधर | १९६५ |
| १६ | अरे बाबा जाहिरात! | जोगळेकर, चिं. वि. | १९४२ |
| १७ | अल्लाउद्दीन आणि जादूचा दिवा | करमरकर, सुधा | १९६५ |
| १८ | अवध्य | खानोलकर, चिं. त्र्यं. | १९७२ |
| १९ | अल्का टॉकीज | कोल्हटकर, प्र. श्री | १९५१ |
| २० | अशी बायको हवी | अत्रे, प्र. के. | १९६१ |
| २१ | अशी पाखरे येती | तेंडूलकर, विजय | १९७० |
| २२ | असुनी नाथ मी अनाथ | खरे, सुरेश | १९७३ |
| २३ | अश्रूंची झाली फुले | कानेटकर, वसंत | १९६७ |
| २४ | अश्वविपल्लव अथवा द्यूत विनोद (सं) | गद्रे, ना. कृ. | १९०१ |
| २५ | अंजन | सबनीस, वि. आ. | - |
| २६ | अंमलदार | देशपांडे, पु. ल. | १९६३ |
| २७ | आई | गद्रे, अ. ह. | १९३१ |
| २८ | आईची माया | दुरवडकर, व. | १९६२ |
| २९ | आठवणीचे घटक | टेंबे, र. गो. | १९३१ |
| ३० | आघात | ग्रव्हे, मो. ह. | १९४४ |
| ३१ | आजोबांच्या मुली | मनोहर, माधव | १९४३ |
| ३२ | आनंद (सं.) | जोशी, म. ना. | १९१६ |
| ३३ | आपल्या पापांचा प्रसाद | मोघे, कृ. ल. | १९५८ |
| ३४ | आग्र्याहून सुटका | औंधकर, वि. ह. | १९६६ |
| ३५ | आग्र्याहून रसुवान | प्रभू, गो. गो. | १९६० |
| ३६ | आत्मविश्वास | नाईकर, रामचंद्रानुज | - |
| ३७ | आत्मसमर्पण | आठल्ये, पा. वि. | १९७२ |
| ३८ | आम्ही विर्जन तमाशा | परांजपे, अशोक | १९७४ |
| ३९ | आवल्या ब्लॅकवर सगोबा | काळे, न. पु. | १९६६ |
| ४० | आराधना | भोळे, ज्योत्स्ना | १९६० |
| ४१ | आले देवाजीच्या मना | अलिबाडकर, ना. | १९६८ |
| ४२ | आशा निराशा | टिपणीस, य. ना. | १९२६ |
| ४३ | आशीर्वाद | रांगणेकर, मो. ग. | १९४० |
| ४४ | असावरी | कालेलकर, मधुसूदन | १९६८ |
| ४५ | आश्रम नं. १० | तोरडमल, म. | १९७१ |
| ४६ | आंधळं दळतय | साबळे, शाहिर | १९६७ |

| क्र. | नाटकाचे नाव | लेखकाचे नाव | वर्ष |
|---|---|---|---|
| ४७ | ऑपरेशन छक्का | पाध्ये, भाऊ | १९६९ |
| ४८ | ऑथेल्लो | शिरवाडकर, वि.वा. | १९६१ |
| ४९ | आंदोलन | शिंदे, मा. कृ. | १९४८ |
| ५० | अेकदाच गाऊ दे | आळंदकर, शशिकला | - |
| ५१ | औदार्यांचा डंका | दीक्षित, कृ. ह. | १९२२ |
| ५२ | इथे ओशाळला मृत्यू | कानेटकर, वसंत | १९६८ |
| ५३ | उग्रमंगल | खरे, वा. वा. | १९६१ |
| ५४ | उत्तरक्रिया | सावरकर, वि. दा. | १९३३ |
| ५५ | उत्तररामचरित्र | गोडबोले, परशुरामपंत | १८५९ |
| ५६ | उत्तरनैषधचरित | कीर्तिकर, का. र. | १९१२ |
| ५७ | उदयाचा महाराष्ट्र | मराठे, ना. द. | १९४८ |
| ५८ | उद्याचा संसार | अत्रे, प्र.के. | १९६४ |
| ५९ | उद्योगी सत्यवान (सं.) उर्फ प्रेमसंसार | देवधर, बा. ना. | १९१२ |
| ६० | उधार उसनवार | जोशी, मा. | १९४६ |
| ६१ | उषा स्वयंवर म्हणजेच वीर शृंगार | फाटक, गणेशशास्त्री | १९५४ |
| ६२ | एक असतो राजा | नवरे, शं. ना. | १९६३ |
| ६३ | एकलव्य | खरे, वि. आ. | १९७२ |
| ६४ | एकच दिवसाची सुकमुक | टेंबल, गो. ग. | १९४० |
| ६५ | एकच प्याला (सं.) | गडकरी, रा. ग. | १९३२ |
| ६६ | एकाच मातीची खेळणी | मतकरी, रत्नाकर | १९६२ |
| ६७ | एकसष्टी | बाम्हणकर, ना. श्री. | १९५९ |
| ६८ | एक होता म्हातारा | रांगणेकर, मो.ग. | १९४८ |
| ६९ | एखाद्याचं नशीब | कोल्हटकर, बाळ | १९६६ |
| ७० | एक शून्य बाजीराव | खानोलकर, चि. त्र्यं. | १९६६ |
| ७१ | एक हट्टी मुलगी | तेंडुलकर, विजय | १९६७ |
| ७२ | एक होता औरंगजेब | फडके, श्याम | १९६५ |
| ७३ | कट्टा कर्मयोगी (सं.) | नेवाळकर, दा.वि. | १९०८ |
| ७४ | कटुकर्तव्य | आगाशे, मा. का. | १९१३ |
| ७५ | कडक लक्ष्मी | वरेरकर, भा. वि. | १९४४ |
| ७६ | कणसा कणसा दाणा दे | भुसारी, दयकुमार | १९६७ |
| ७७ | कन्याविहार | बेलसकर, पां. अ. | १९४१ |
| ७८ | कल्पनेचा खेळ | दारव्हेकर, पु. | १९५६ |
| ७९ | कल्पवृक्ष कन्येसाठी | कालेलकर, म. | १९७२ |
| ८० | कल्याण खजिना | पराडकर, ना. बा. | १९५९ |
| ८१ | कट्यार काळजात घुसली | दारव्हेकर, पु. | १९६९ |

| क्र. | नाटकाचे नाव | लेखकाचे नाव | वर्ष |
|---|---|---|---|
| ८२ | करग्रहण | वरेरकर, भा. वि. | १९२७ |
| ८३ | करायला गेलो एक | गोखले, बाबुराव | १९६७ |
| ८४ | करीन ती पूर्व | वरेरकर, भा. वि. | १९६४ |
| ८५ | कविराय राम जोशी | पवार, ग. ना. | १९६२ |
| ८६ | कहा राजनिष्ठ देशभक्त | पागळ, ता. ने. | १९१६ |
| ८७ | कसेल त्याची जमीन | डावरे, पद्माकर | १९६३ |
| ८८ | कळलाव्या कांद्याची कहाणी | मतकरी, रत्नाकर | १९६० |
| ८९ | कळतं पण वळतं कुठे? | पुरंदरे, भा. नि. | १९७१ |
| ९० | कलावंतीण (सं.) | पाठारे, वि. आ. | १९३७ |
| ९१ | कादंबरी | परांजपे, शि. म. | १८९७ |
| ९२ | कालाय तस्मै नमः | खानोलकर, चि. त्र्यं. | १९७२ |
| ९३ | कावडी चुंबक | अत्रे, प्र. के. | १९५५ |
| ९४ | कावळे | दळवी, जयवंत | १९७३ |
| ९५ | कावळ्यांची शाळा | तेंडुलकर, विजय | १९६४ |
| ९६ | काहूर (सं.) | सहस्रबुद्धे, उमाबाई | १९४८ |
| ९७ | काळे-गोरे | फडके, ना. सी. | १९४५ |
| ९८ | काळं बेट लाल बत्ती | गोरडमल, म. | १९६९ |
| ९९ | कांचनगंगा | शिंदे, राजाराम | १९६० |
| १०० | कांचनरंग | मिश्रा, शंभु | १९६८ |
| १०१ | कांचनगडची मोहना | खाडिलकर, कृ. प्र. | १९६३ |
| १०२ | कुमारी १९३१ | गद्रे, अ.ह. | १९३१ |
| १०३ | कुंकू जपून ठेव | दना, केशव | १९७२ |
| १०४ | कुंजविहारी (सं.) | वरेरकर, भा.वि. | १९२५ |
| १०५ | कुलवधू | रांगणेकर, मो. ग. | १९४२ |
| १०६ | कुसुम वसंत अथवा रत्नप्रभाव | केळकर, कृ. गो. | १९०७ |
| १०७ | कुंपणावरून | रानडे, श्री. वा. | १९४७ |
| १०८ | किचक वध | खाडिलकर, कृ. प्र. | १९६३ |
| १०९ | कृष्ण कारस्थान (सं.) | गद्रे, नी. चि. | १९३६ |
| ११० | कृष्णार्जुन युद्ध (सं.) | केळकर, न. चि. | - |
| १११ | कोंडिविरीच्या काड्या | आळतेकर, म. मा. | १९४६ |
| ११२ | कोणे एके काळी | रांगणेकर, मो. ग. | १९५० |
| ११३ | खरा ब्राह्मण | ठाकरे, के. (प्रबोधनकार) | १९३३ |
| ११४ | खडाष्टक | जोशी, श. प. | १९५० |
| ११५ | खून पहावा करून | पदकी, सरिता | १९६४ |

| क्र. | नाटकाचे नाव | लेखकाचे नाव | वर्ष |
|---|---|---|---|
| ११६ | गजेंद्रसिंग | नाथमाधव | १९११ |
| ११७ | गर्वनिर्वाण | गडकरी, रा. ग. | - |
| ११८ | गर्वहरण | जयकर, वि. आ. | - |
| ११९ | गरिबांचे राज्य | कामत, रंगा | १९६२ |
| १२० | गहीवरला शिवराया | शिवलकर, मुरारी | १९६६ |
| १२१ | गंभीर घटना | टेंबे, गो. स. | १९३२ |
| १२२ | गाणारा मुलुख | मिरासदार, द. मा. | १९७१ |
| १२३ | गान काकू | वकील, व्यंकटेश | १९५१ |
| १२४ | गारंबीचा बापू | पेंडसे, श्री. ना. | १९६८ |
| १२५ | गार्बो | एलकुंचवार, महेश | १९७३ |
| १२६ | ग्यानबाची मेख | साबळे, शाहीर | १९६३ |
| १२७ | गिरणीवाडा अथवा मालकमजूर (सं.) | जोशी, मा. वा. | १९२९ |
| १२८ | गुणोत्कर्ष | खरे, वा. वा. | १९३० |
| १२९ | गुरू | पवार, रमेश | १९७४ |
| १३० | गुरुबाजी | कर्वे, र. धों. | १९३७ |
| १३१ | गुरुदक्षिणा | अत्रे, प्र. के. | १९३० |
| १३२ | गुलाबाचे फूल | खरे, भा. द. | १९५१ |
| १३३ | गुप्तमंजूष | कोल्हटकर, श्री. कृ. | १९०३ |
| १३४ | गुंतता हृदय हे | नवरे, शं. ना. | १९७४ |
| १३५ | गृहलक्ष्मी | शिंदे, मा. कृ. | १९३४ |
| १३६ | गैरसमज (सं.) | वैद्य, ना. आ. | १९३४ |
| १३७ | गोपीचंद (सं.) | बर्वे, अ. वा. | १९०४ |
| १३८ | गोदावरी अथवा दुर्दैवी सून | लोंढे, मो. ग. | १८९० |
| १३९ | घनःश्याम नयनी आला | दारव्हेकर, पु. | १९६८ |
| १४० | घरकूल | कानेकर, अनंत | १९४१ |
| १४१ | घरंदाज | फाडकर, ना. वा. | १९४० |
| १४२ | घराबाहेर | अत्रे, प्र. के. | १९६३ |
| १४३ | घरात फुलला पारिजात | कानेटकर, वसंत | १९६९ |
| १४४ | घागरगडची सुभेदार | गुराजी, कृ. आ. | १९१५ |
| १४५ | घाशीराम कोतवाल | तेंडुलकर, विजय | १९७३ |
| १४६ | घेतल शिंगावर | काटदरे, मनोहर | १९७१ |
| १४७ | टाकलेत पोर | ठाकरे, के. सी. | १९३९ |
| १४८ | डाव फसला | काळे, ग. दि. | १९२० |
| १४९ | डॉ. लागू | अत्रे, प्र. के. | १९६७ |
| १५० | चक्र | पुंडलीक, विद्याधर | १९६६ |
| १५१ | चतुरगडच्या विनोदी स्त्रीया | लिमये, पां. ग. | १९०५ |
| १५२ | चंद्रग्रहण | टिपणीस, य. ना. | १९१८ |
| १५३ | चंद्रगुप्त | केळकर, न. चिं. | १९१३ |
| १५४ | चंद्र नभीचा ढळला | दारव्हेकर, पु. | १९६१ |
| १५५ | चंपा अथवा नरगुंदकर व टिपू सुलतान यांची लढाई | लिमये, न. र. | १८९१ |
| १५६ | चार्वाक | किर्लोस्कर, श्री. वा. | १९५८ |
| १५७ | चांद रात | काणेकर, अ. | १९३३ |
| १५८ | चांदणे शिंपीत जा | कालेलकर, म. | १९७३ |
| १५९ | चिखलातले कमळ | बापट, सी. म. | १९५६ |
| १६० | चिलखतराज जगन्नाथ | सबनीस, वसंत | १९७२ |
| १६१ | चिमणा बांधतो बंगला | तेंडुलकर, विजय | १९६६ |
| १६२ | चित्त शुद्ध तरी | केळुसकर, दत्तात्रय | १९६२ |
| १६३ | चूल आणि मूल | वेडेकर, वि. | - |
| १६४ | चोराचा मोर | प्रभु, वचन | १९६० |
| १६५ | चौदावे रत्न (सं.) | कोल्हटकर, बा. य. | १९२४ |
| १६६ | छापील संसार | साठे, शं. गो. | १९३८ |
| १६७ | जग काय म्हणेल | अत्रे, प्र. के. | १९५१ |
| १६८ | जनता जनार्दन (सं.) | सारोळकर, द. ग. | १९२६ |
| १६९ | जय जय गौरीशंकर | गोखले, विद्याधर | १९६६ |
| १७० | जयकेतु | रेगे, सदानंद | १९५९ |
| १७१ | जयजयकार | रांगणेकर, मो. ग. | १९५३ |
| १७२ | जयंत जुगारी (सं.) | जयकर, वि. आ. | १९३५ |
| १७३ | जळता गोपांत्रक | बर्वे, स. पा. | १९५५ |
| १७४ | जळती घरे | वकील, व्यं. श. | १९४२ |
| १७५ | जंगली कबूतर | भगत, व. सु. | १९७४ |
| १७६ | जागती ज्योत | वरेरकर, भा. वि. | १९३३ |
| १७७ | जातिवंत जवान | परचुले, ज. पां. | १९४६ |
| १७८ | जातिवंत मराठा वीर | नाथ माधव | १९५४ |
| १७९ | जादूचा वेल | करमरकर, सुधा | १९५९ |
| १८० | जिद्द | राजणकर, यशवंत | १९६३ |
| १८१ | जिवा शिवाची भेट | वरेरकर, भा. वि. | १९५० |
| १८२ | जीवन | तळेगावकर, द. मा. | - |
| १८३ | जीवन संगीत | तेंडुलकर, भा. र. | - |
| १८४ | जुन्नेबाजी | काळे, एस. | १९३५ |

| क्र. | नाटकाचे नाव | लेखकाचे नाव | वर्ष |
|---|---|---|---|
| १८५ | झुलता पूल | आळेकर, सतिश | १९७३ |
| १८६ | झुंझार राव | देवल, गो. ब. | १९५५ |
| १८७ | झोपी गेलेला जागा झाला | प्रभु, बबन | १९७३ |
| १८८ | तरुण तुर्क म्हातारे अर्क | तोरडमल, मधुकर | १९७२ |
| १८९ | तरुण पिढी | गद्रे, अ. ह. | १९३१ |
| १९० | तरुणा भिल्ल | गुर्जे, शां. गो. | १९५८ |
| १९१ | तापसी आरपा (सं) | वर्तक, ना. प्र. | १९११ |
| १९२ | तारक - मारक (सं) | नेवाळकर, रा. चि. | १९०८ |
| १९३ | तारा | महाजनी, वि. मो. | १९०९ |
| १९४ | तारामंडळ | खरे, ना. वा. | १९१४ |
| १९५ | तिकडची शोभा | कुलकर्णी, ना. वि. | १९३३ |
| १९६ | तीन प्रहसने | आपटे, ह. ना. | १९६४ |
| १९७ | तुका म्हणे आता | देशपांडे, पु. ल. | १९४८ |
| १९८ | तुच माझी राणी | खरे, सुरेश | १९७३ |
| १९९ | तुझा तू वाढवी राजा | कानेटकर, वसंत | १९६९ |
| २०० | तुझे आहे तुझ्यापाशी | देशपांडे, पु. ल. | १९६७ |
| २०१ | तुरुंगाच्या दारात | वरेरकर, भा.वि. | १९२३ |
| २०२ | तुलसीदास (सं.) | टेंबे, गो. स. | १९२८ |
| २०३ | ते झोपले इर्दुरे | आहीकर, म. र. | १९६२ |
| २०४ | तोची आवडे देवाला | वेंगुर्लेकर | १९६३ |
| २०५ | तोतयाचे बंड | केळकर, न. चिं. | १९३१ |
| २०६ | तो मी नव्हेच | अत्रे, प्र. के. | १९६२ |
| २०७ | त्रिदंडी सन्यास (सं.) | खाडिलकर, कृ. प्र. | १९६३ |
| २०८ | थोरले माधवराव पेशवे व नयपाल | कितने, वि. ज. | १९२७ |
| २०९ | दख्खनचा दिवा | टिपणीस, य. ना. | १९३६ |
| २१० | दंडधारी (सं) | नेवाळकर, रा. चि. | १९०९ |
| २११ | दामाजी | आगटे, बा. नी. | १९०९ |
| २१२ | दामिनी | पेडणेकर, हिराबाई | १९१२ |
| २१३ | दामाआड (सं) | खासगीवाले, अ. ह. | १९४३ |
| २१४ | दिवूच्या सासूबाई रपाबाई | प्रभु, बबन | १९७१ |
| २१५ | दिवाजी राणा | नाईक, गुरुनाथ | १९६६ |
| २१६ | दिवा जळू दे सारी रात | कालेलकर, म. | १९६१ |
| २१७ | दिशाभूल | देवस्थळी, गो. म. | १९२३ |
| २१८ | दुधात साखर | मोघे, कृ.ल. | १९६० |
| २१९ | दुरिताचे तिमिर जावो | कोल्हटकर, बाळ | १९६५ |

| क्र. | नाटकाचे नाव | लेखकाचे नाव | वर्ष |
|---|---|---|---|
| २२० | दुसरा पेशवा | शिरवाडकर, वि. वा. | १९४७ |
| २२१ | दूरचे दिवे | शिरवाडकर, वि. वा. | १९४६ |
| २२२ | देवकी | कर्णिक, मधुमंगेश | १९६८ |
| २२३ | देव लाभला निवापणी | कुळकर्णी, दत्ता | १९६६ |
| २२४ | देव दिना घरी धावला | कोल्हटकर, बाळ | १९७२ |
| २२५ | देवमाणूस | जोशी, नागेश | १९४८ |
| २२६ | देवाचे घर | शिरवाडकर, वि. वा. | १९५६ |
| २२७ | देवी अहिल्या (सं) | देशपांडे, दि.चि. | १९३४ |
| २२८ | दोन घडीचा डाव | वऱ्हाडकर, शरद | १९६१ |
| २२९ | दोन ध्रुवावर दोघे आपण | कानेटकर, वसंत | १९६३ |
| २३० | द्रौपदी | खाडिलकर, कृ.प्र. | १९२० |
| २३१ | धर्मरहस्य | नेवाळकर, रा. चि; | १९०९ |
| २३२ | धुक्यात हरवली वाट | नवरे, श. ना. | १९७३ |
| २३३ | धुळीचे कण | धनवटे, सुमती | १९५१ |
| २३४ | नकटीच्या लग्नाला | रांजणकर, यशवन्त | १९७३ |
| २३५ | नटेश्वर | मर्ढेकर, बा. सी. | १९६५ |
| २३६ | नदी शेवटी सागराला मिळाली | फडके, श्याम | १९६८ |
| २३७ | नमस्कार वाचून हे साष्टांग नमस्कार | निरंतर, गं. पा. | १९४८ |
| २३८ | न मागता | वरेरकर, भा. वि. | १९४४ |
| २३९ | नयनात आसवे हसली | देशमुख, गो. दा. | १९६८ |
| २४० | नरवीर मालुसरे | भिलवडीकर, वि. द. | १९०९ |
| २४१ | नरो वा कुंजरो वा | बेडेकर, विश्राम | १९६१ |
| २४२ | नल दमयंती | सोंकर, बा. श्री. | १८००- १८७९ |
| २४३ | नलराजा दमयंती (सं) | भिडे, वा. वा. | १९६८ |
| २४४ | नवरा म्हणू नये आपला | नवरे, श. ना. | १९६४ |
| २४५ | नवरत्नहार | गद्रे, अ. ह. | १९४२ |
| २४६ | नवा पाईक | निटणीस, य. न. | - |
| २४७ | नवे जग | मावकर, सुं. भु. | १९५५ |
| २४८ | नवीन कल्पना | कुलकर्णी, ना. वि. | १९४२ |
| २४९ | नव्या ज्योती | वकील, त्र्यं. शं. | १९३९ |
| २५० | नसती उठाठेव | भिडे, श्री. र. | - |
| २५१ | नंदकुमार (सं) | गुर्जर, वि. सी. | १९२५ |
| २५२ | नारिंगी निशाण | कोल्हटकर, अ. ब. | १९२७ |

| क्र. | नाटकाचे नाव | लेखकाचे नाव | वर्ष |
|---|---|---|---|
| २५३ | नाटिका नवरत्नहार | गद्र, अ. ह. | १९४२ |
| २५४ | नाट्य संकिर्तन | कुलकर्णी, व्यं. न. | १९६४ |
| २५५ | न्यायाचा शोध | कर्वे, र. धो. | - |
| २५६ | निजधामगमन (सं) | कोठारी, सी. | १९३७ |
| २५७ | निशिकांतची नवरी | काणेकर, अ. | १९४८ |
| २५८ | नूतन शिलेदारी | माळगावकर, शि. ना | १९२८ |
| २५९ | नेपोलियन | नरवणे, कविता | १९७० |
| २६० | पट्टे बापूराव | भावे, ल. ना. | १९५९ |
| २६१ | पण लक्षात कोण घेतो? | सातारकर, मधुकर | १९६४ |
| २६२ | पतंगाची दोरी | काणेकर, अनंत | १९५१ |
| २६३ | पतित एकदा पतित का सदा | रांगणेकर, मो. ग. | १९६५ |
| २६४ | पतितो उद्धार | शेणवी | १९३० |
| २६५ | पतितपावन | वरेरकर, भा.वि. | १९३१ |
| २६६ | पती-पत्नी | चाफेकर, न. भा. | १९७२ |
| २६७ | पन्हाळगडचा किल्लेदार | किरात | १९१५ |
| २६८ | परक्याचे धन | भट, गो. के. | १९५४ |
| २६९ | पराचा कावळा | अत्रे, प्र. के. | १९६३ |
| २७० | परि तु जागा चुकलासी | महाजन, ह. रा. | १९६० |
| २७१ | परिवर्तन | कोल्हटकर, श्री. कृ. | १९२३ |
| २७२ | पहिला पर्दा | शेत्ते, अमर | १९५१ |
| २७३ | पहिला पांडव | परांजपे, शि. म. | १९३१ |
| २७४ | पळा पळा कोण पुढे पळे तो ! | प्रभु, बबन | १९७४ |
| २७५ | पंत तुकाराम | आपटे, दत्ता | १९५६ |
| २७६ | पंचम हेनरी चरित | बोलसरे, खं. भि. | १९११ |
| २७७ | प्रणयमुद्रा (सं) | गुर्जर, वि. सी. | १९०५ |
| २७८ | प्रणयविवाह | मोडक, वि. वि. | १९०२ |
| २७९ | प्रणय नंदा | आजगांवकर, ज. र. | १९१० |
| २८० | प्रणयी - किटक | बर्वे, स. प. | १९६३ |
| २८१ | प्रणयी युवराज | शहा, वा. ना. | १९१७ |
| २८२ | प्रमत मोहिनी | वड्डे, शं. कृ. | १९२२ |
| २८३ | प्रमाद प्रमोद | रानडे, शं. मो. | १८९२ |
| २८४ | प्रेम गुंफा (सं) | नेवाळकर, दा.वि. | १९०८ |
| २८५ | प्रपंच करावा नेटका | जोशी, दि.वि. | १९६४ |
| २८६ | पापी पुण्य | वरेरकर, भा. वि. | १९३० |
| २८७ | पाणी ग्रहण | अत्रे, प्र. के. | १९४६ |
| २८८ | पानपतचा मुकाबला | शिरवळकर, वा. रं. | १९०७ |
| २८९ | पाहुणे | समर्थ, व. ना. | १९५२ |
| २९० | पाहुणा | दातार, ग. द. | १९४६ |
| २९१ | पांढरपेशा | पाठारे, वि. आ. | १९४० |
| २९२ | पांघरलेली कातडी | परांजपे | १९४२ |
| २९३ | पिशाचो | वेहेरे, ता. के. | १९३५ |
| २९४ | पितृप्रेम | - | १९११ |
| २९५ | पियानो | पाटील, वसुधा | १९७४ |
| २९६ | प्रीती मिळेल का हो? | जावडेकर, मुरलीधर | १९७४ |
| २९७ | प्रीती परी तुजवरती | होमणे, राजाराम | १९७१ |
| २९८ | प्रीतिसंगम | अत्रे, प्र. के. | १९६८ |
| २९९ | पुण्यप्रभाव (सं) | गडकरी, राम गणेश | १९३५ |
| ३०० | पुनंर्जन्म | वर्वे, स. पा. | १९६० |
| ३०१ | पूर्ण स्वातंत्र्य | गद्रे, अ. ह. | १९३० |
| ३०२ | प्रेम कहाणी | मतकरी, रत्नाकर | १९७३ |
| ३०३ | प्रेमबंधन (सं) | पूर्वदेशी, गु. हि. | १९०९ |
| ३०४ | प्रेमध्वज | खाडिलकर, कृ. प्र. | १९११ |
| ३०५ | प्रेम निराशा | दुभाषी, वा. म. | १९११ |
| ३०६ | प्रेम शोधन (सं) | कोल्हटकर, श्री. कृ. | १९११ |
| ३०७ | प्रेमसन्यास | गडकरी, रा. ग. | १९२२ |
| ३०८ | प्रेमा तुझा रंग कसा? | कानेटकर, वसंत | १९६६ |
| ३०९ | पेल्यातील वादळ | गोखले, बबुराव | १९४२ |
| ३१० | पैसाच पैसा | जोशी, म. ना. | १९३५ |
| ३११ | पैसा नाही मग लगता कशाला? | अचरेकर, ला. | १९६९ |
| ३१२ | प्रोफेसर शहाणे (सं) | जोशी, मा. ना. | १९३६ |
| ३१३ | फुलाला सुगंध मातीचा | माग, शरद | १९७१ |
| ३१४ | बनावट सही | गोरे, श्री. वि. | १९२७ |
| ३१५ | ब्रह्मचारी | अत्रे, प्र. के. | १९६८ |
| ३१६ | ब्रह्म हत्या | मतकरी, रत्नाकर | १९६७ |
| ३१७ | बहिण भाऊ | ताम्हणकर, ना. धो. | १९३८ |
| ३१८ | बहिर्जी नाईक | वनविहारी | १९४५ |
| ३१९ | बाकी इतिहास | सरकार, बादल | १९७३ |
| ३२० | बाजीरावाचा बेटा | सरपोतदार, न. दा. | १९३७ |
| ३२१ | बाजी आणि डेंडी | घाटे, वि. दा. | १९६४ |
| ३२२ | बाबा मी नोकरी करणार | देशमुख, न. गो. | १९४५ |

(क्रमशः - पुढील अंकात चालु)